www.lokrakshanay.com epaper.lokrakshanay.com dainiklokrakshanay@gmail.com +91 97023 86118

दैनिक

# लोकरक्षणाय

प्रकाशन ठाणे सह एकाच वेळी प्रसारित - पालघर, मुंबई, पुणे, रायगड, सातारा, कोल्हापूर, नाशिक लोकशाहीच्या संरक्षणार्थ

सहसंपादक - अनिकेत घनश्याम भंकाळ ■ वर्ष - ०२ ■ अंक ६५ ■ पृष्ठे- ०६ ■ ठाणे, मंगळवार, १६ जुलै २०२४ ■ रु. २/- ■ RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118

## थोडक्यात



### दहावी, बारावीची पुरवणी परीक्षा आजपासून

● पुणे, अभिजित येरल्लू :

राज्य मंडळातर्फे दहावी आणि बारावीची पुरवणी परीक्षा मंगळवारपासून (१६ जुलै) सुरू होत आहे. गेल्यावर्षीच्या तुलनेत यंदा या परीक्षेसाठी विद्यार्थ्यांच्या नोंदणीमध्ये मोठी घट झाल्याचे दिसून येत आहे.राज्य मंडळाच्या नऊ विभागीय मंडळांमार्फत दहावीची पुरवणी परीक्षा १६ जुलै ते ३० जुलै या कालावधीत, तर बारावीची परीक्षा १६ जुलै ते ८ ऑगस्ट या कालावधीत घेतली जाणार आहे. परीक्षेसाठी राज्य मंडळामार्फत प्रसिद्ध आणि छपाई केलेले वेळापत्रकच ग्राह्य धरावे, अन्य संकेतस्थळांवरील किंवा अन्य यंत्रणेने छपाई केलेले वेळापत्रक ग्राह्य धरू नये. सकाळ सत्रात साडेदहा वाजता, दुपार सत्रात अडीच वाजता विद्यार्थ्यांने परीक्षा दालनात उपस्थित राहणे आवश्यक आहे. सकाळ सत्रात अकरा वाजता, दुपार सत्रात तीन वाजता प्रश्नपत्रिकांचे वितरण करण्यात येईल.

पान २ वर

### मरीन ड्राईव्ह येथील समुद्रात तरूणीची आत्महत्या



● मुंबई, दिगंबर जाधव :

मरीन ड्राईव्ह येथे सोमवारी एक तरूणी बुडत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्या माहितीच्या आधारे मरीन ड्राईव्ह पोलीस व अग्निशमन दल घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी समुद्रातून तरूणीला बाहेर काढून जी.टी. रुग्णालयात नेले. तेथील डॉक्टरांनी तिला मृत घोषित केले. हा आत्महत्येचा प्रकार असल्याचा पोलिसांना संशय आहे.महिलेने समुद्रात उडी मारण्यापूर्वी चौपाटीवर तिची बॅग सोडली. त्यातील ओळख पत्रावरून महिलेचे नाव ममता प्रवीण कदम(२३) असल्याचे पोलिसांना समजले. तरूणी अंधेरी येथे राहण्यास असून एका प्रसिद्ध माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील कंपनीत कामाला होता.

पान २ वर

### अंगणवाडी मदतनीसांची १४ हजार रिक्त पदे लवकरच भरणार - महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे



● मुंबई, विशाल कारंडे :

राज्यातील अंगणवाडी मदतनीसांची १४ हजार ६९० रिक्त पदे लवकरच भरण्यात येणार आहेत, अशी माहिती महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिली.मंत्री कु.तटकरे म्हणाल्या की, एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत राज्यातील जिल्हा परिषद अंतर्गत ग्रामीण/ आदिवासी प्रकल्पातील कार्यरत अंगणवाडी केंद्रांमध्ये अंगणवाडी मदतनीसांची १३ हजार ९०७ रिक्त पदे आहेत.

पान २ वर

# हवामान खात्याचा 'हायअलर्ट', 18 जुलैपर्यंत राज्यात मुसळधार

● नागपूर, नितीन देवळेकर :



जुलैच्या पहिल्या आठवड्यापर्यंत काहीसा थांबलेल्या मोसमी पावसाने पुन्हा जोर पकडला आहे. गेल्या आठवड्यापासून राज्यातील बहूतांश भागात मुसळधार पावसाने हजेरी लावली आहे. त्यामुळे काही जिल्ह्यांमध्ये पूरस्थिती निर्माण होऊन जनजीवन विस्कळीत झाले आहे. दरम्यान, भारतीय हवामान खात्याने पावसाचा 'हायअलर्ट' दिला असून येत्या १८ जुलैपर्यंत राज्यात ठिकठिकाणी मूसळधार पावसाची शक्यता वर्तवली आहे. भारतीय हवामान खात्याने राज्यातील अनेक जिल्ह्यांना पावसाचा 'हायअलर्ट' दिला आहे. जळगाव, रत्नागिरी येथे 'रेड अलर्ट' देण्यात आला असून रायगड, सिंधुदुर्ग, पुणे, कोल्हापूर, सातारा येथे पावसाचा 'ऑरेंज अलर्ट' देण्यात आला आहे.

पान २ वर

पश्चिम विदर्भात मूसळधार पावसाने हजेरी लावली असली तरीही पूर्व विदर्भात मात्र उकाडा आणि उन्हाने नागरिक त्रस्त होते. मात्र, रविवारपासून पूर्व विदर्भात देखील पावसाला सुरुवात झाली आहे. हा पाऊस असाच कायम राहील्यास उकाड्यापासुन सुटका होईल. तर त्याचवेळी पावसाअभावी थांबलेल्या पेरण्यांना देखील वेग येईल. जून महिन्यात मोसमी पावसाने वेळेआधीच आगमन केले, पण पावसाची मोठी तूट याकाळात होती. आगमनाची वर्दी देऊन मोसमी पावसाने पाठ फिरवल्याने शेतकऱ्यांवर मोठे संकट आले. लवकर येणारा मोसमी पाऊस आणि हवामान खात्याच्या अंदाजामुळे अनेक शेतकऱ्यांनी पहिल्या पावसात पेरणीला सुरुवात केली होती. मात्र, त्यानंतर पावसाचा मोठा खंड पडला. दरम्यान, आता पुन्हा एकदा मोसमी पावसाने वेग पकडला आहे. तर हवामान खात्यानेही पावसाचा 'हायअलर्ट' दिला आहे.

## शेततळ्यासाठी 100% अनुदानाचा शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा

● मीरारोड, विशाल पाटील :



महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत 266 कामे अनुज्ञेय असुन सदर कामांच्या माध्यमातुन गावा सोबतच गावातील लोकांचाही विकास शक्य होणार आहे. या योजनेच्या माध्यमातून "मी समृध्द तर गाव समृध्द पर्यायाने माझा महाराष्ट्र समृध्द" संकल्पना राज्यात राबविण्यात येत आहे. पालघर जिल्हयामध्ये पावसाचे प्रमाण जास्त असतांनाही उन्हाळयांत पाण्याचे दुर्भिक्ष जिल्हयाच्या बहूतांश भागात दिसुन येते. या परिस्थीतीवर मात करण्याकरीता जल पुर्णभरण व जलसंधारण कामांची आवश्यकता पाहता मग्रारोहयोच्या माध्यमातून पाणी भुगर्भात जीरविण्याकरीता "जलतारा " तर शेत शिवाराकरीता तसेच मत्स्यंवर्धनाच्या हेतूने " शेततळे " मोठ्या प्रमाणावर शेतकऱ्यांनी घेण्याचे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले.. याकरीता १००% अनुदान शासनामार्फत दिले जाते. जलतारा करीता 4800/- [1.50m x 1.50m x 1.80m] व शेततळे [ 10 x 10 x 3m], ते [30 x 30 x 3 m] वरील शततळे 100% मजूरांमार्फत खोदल्यास अस्तरीकरण करीताही अनुदान 1.75 लक्ष ते 5.50 लक्ष (अंदाजित) योजनेच्या माध्यमातून दिले जाते.

## विशाळगड हिंसाचारावर शाहू महाराजांकडून तीव्र निषेध



● कोल्हापूर , नितीन देवळेकर :

मी आक्रमक होतो पण मी माझ्या स्वर्थासाठी नाही तर शिवाजी महाराज यांच्या विशाळगडावर झालेल्या अतिक्रमणामुळे आक्रमक झालो, या सगळयासाठी मी आक्रमक झालो असेल तर मला गर्व असल्याची प्रतिक्रिया माजी खासदार संभाजीराजे छत्रपती यांनी दिली आहे. खासदार शाहू महाराज यांनी संभाजीराजे यांनी घेतलेल्या आक्रमक पवित्र्यावर तीव्र शब्दात निषेध केला आहे. यानंतर आता संभाजीराजे यांनी भूमिका स्पष्ट केली. शाहू महाराज यांनी तीव्र शब्दात निषेध केल्यानंतर संभाजीराजे म्हणाले की, शाहू महाराज यांनी दोन भूमिका घेतल्या. एक म्हणजे त्यांनी खासदार म्हणून भूमिका घेतली. ते पुढे म्हणाले की, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्रीयांची बैठक लावायला पाहिजे असं शाहू महाराज यांनी सांगितली होते, पण अशी कोणतीही चर्चा झाली नाही.

पान २ वर

## नियोजनाच्या अभावामुळे मुंबई गोवा महामार्गाच्या उड्डाणपुलावरील पावसाचे पाणी थेट रस्त्यावर!

● महाड , दिगंबर जाधव :



मुंबई गोवा. राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 66 वरील सर्वच उ उड्डाणपुलावरील पाणी थेट महामार्गावरील सर्विस रोडवर वरील रस्त्यावर कोसळत असल्याने स्थानिक नागरिकांना याचा प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. पावसाच्या पाण्याचा निचरा करणारे योग्य नियोजना अभावी अपघाताला कारणीभूत ठरत असल्याचे चित्र राष्ट्रीय महामार्गावर पाहण्यास मिळत आहे. मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 66 नूतनीकरणाच्या कामात अनेक उड्डाणपूलांवर साठणारे पाणी पाईप द्वारे फुलाच्या खाली असणाऱ्या गटारामध्ये सोडण्याचे नियोजन असताना हे नियोजन पूर्णपणे राष्ट्रीय महामार्ग खात्याच्या ढिसाळ कारभारामुळे वाया गेले आहे पुलावरील पाणी थेट सर्विस रोडवरील रस्त्यावर येऊन पाण्याचा प्रवाह तयार होत आहे. पावसाळी पाणी निचरा करण्यासाठी योग्य नियोजन केले नसल्याने हि स्थिती निर्माण झाली आहे. यामुळे ठेकेदार कंपनी आणि स्थानिक महामार्ग विभागाच्या कामाबाबत आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

मुंबई गोवा महामार्गाच्या कामाच्या गुणवत्तेवर . मागील सतरा वर्षात कायम प्रश्नचिन्ह उभा राहिल आहे. रस्ता समतोल पातळीत नसल्याने होणाऱ्या जम्पिंग जपाक मुळे वाहनांचे नुकसान होत मात्र त्याचा त्रास वाहनातून प्रवास करणाऱ्या वृद्ध व अपंग व्यक्तींसहित गर्भवती महिलांना देखील होत आहे.

पान २ वर

## ठाण्यात साथीचे आजार असतानाही घोडबंदररोडवरील घंटागाड्या बंद!

### सोसायट्यांबाहेर कचरा पडून, माजी गटनेते मनोहर डुंबरे यांची तक्रार

● ठाणे, यश सावंत :



शहरात साथीच्या रोगांचा प्रार्दुभाव वाढत असतानाच, शहरातील घोडबंदर रोडवरील ब्रह्मांड, पातलीपाडा, हिरानंदानी इस्टेट, कोलशेत भागात कचरा उचलणाऱ्या घंटागाड्या बंद झाल्या आहेत. परिणामी सोसायट्या व इमारतींच्या गेटबाहेर ड्रममध्ये कचऱ्याचे ढीग झाले आहेत. या संदर्भात तत्काळ दखल घेण्याची मागणी भाजपाचे माजी गटनेते मनोहर डुंबरे यांनी महापालिकेचे आयुक्त सौरभ राव यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे. ठाणे शहरात साथीच्या आजारांनी डोके वर काढले असून, डेंग्यु, मलेरिया आणि एच ३ एन २ आजाराचे रुग्ण आढळले आहेत. तर डेंग्युच्या रुग्णांची संख्या वाढत आहे. पावसाळयात संसर्गजन्य व साथीच्या आजारांचा धोका असतानाच, शहरात स्वच्छता गरजेची आहे. परंतु, गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या ऐन मुसळधार पावसात ठाण्यात ठिकठिकाणी कचरा साचला असल्याचे चित्र दिसत आहे.

पान २ वर

## रेल्वे प्रवाशांच्या समस्येवरून खा. सुरेश म्हात्रेंचा केडीएमसी रेल्वे अधिकाऱ्यांना दम

● ठाणे, विशाल पाटील :



स्टेशनवरील स्काय वॉकवर अतिक्रमण करणाऱ्या फेरीवाल्यांवर कारवाई झालीच पाहिजे, आम्ही एक वेळा, दोन वेळा, तीन वेळा विनंती करू, पण त्यानंतरही अधिकारी ऐकत नसतील तर चौथ्या वेळी जी काही कारवाई करू ती समोरासमोर करू असा सज्जड दम खासदार सुरेश म्हात्रे यांनी केडीएमसीसह रेल्वे अधिकाऱ्याना दिला. सुरेश म्हात्रे उर्फ बाळयामामा यांनी कल्याण रेल्वे स्टेशनवरील समस्यांचा आढावा घेतला. तसेच प्रवासी संघटनांशी चर्चा केली. यावेळी खासदार म्हात्रे यांनी रेल्वे अधिकाऱ्यांना धारेवर धरत समस्या लवकरात लवकर सोडवण्याच्या सूचना केल्या.

भिवंडी लोकसभेचे खासदार सुरेश म्हात्रे यांनी कल्याण रेल्वे स्टेशनची पाहणी केली. यावेळी खासदार म्हात्रे यांनी रेल्वे प्रवासी संघटनेचे पदाधिकारी, नागरिकांशी चर्चा करत प्रवाशांना भेडसावणाऱ्या समस्या रेल्वे अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून दिल्या. या बैठकीस केडीएमसीचे अधिकारी उपस्थित होते.

कल्याण रेल्वे स्थानकावर स्वच्छतागृह वाढवण्यात यावेत, त्याचप्रमाणे स्वच्छता राखण्यात यावी, स्काय वॉकवर अनधिकृतपणे अतिक्रमण करणारे फेरीवाले महिलांची छेडछाड करतात, प्रवाशांना त्रास देतात अशा फेरीवाल्यांवर कठोर कारवाई करावी अशी मागणी खासदार म्हात्रे यांनी यावेळी रेल्वे अधिकाऱ्यासह केडीएमसी प्रशासनाकडे केली.

पान २ वर

## कोकण रेल्वेत अडकलेल्या प्रवाशांना एसटीचा आधार, विशेष बस सोडण्यात आल्याने दिलासा



● रत्नागिरी , दिगंबर जाधव :

रत्नागिरी जिल्ह्यात सलग दोन दिवस कोसळणाऱ्या मुसळधार पावसामुळे खेड, चिपळूण, राजापूर, संगमेश्वर या भागात पूर आला आहे. त्यामुळे संपूर्ण जनजीवन विस्कळीत झाले आहे. कोकण रेल्वे मार्गावरील दिवाणखवटी नातुवाडी बोगद्याजवळ माती आणि झाडे रेल्वे रुळावर आल्याने, रेल्वे सेवा ठप्प झाली आहे. अनेक रेल्वेगाड्या जागच्याजागी थांबल्या आहेत. त्यामुळे प्रवासी गेले अनेक तास गाड्यांमध्ये, स्थानकांवर अडकले आहेत. त्यांच्या सोयीसाठी एसटीच्या विशेष बसचा ताफा कोकण रेल्वेच्या स्थानकात उभा करण्यात आला आहे. कोकणात पडणाऱ्या मुसळधार पावसाचा फटका कोकण रेल्वेला बसला असून, पूर्व पावसाळी केलेली कामे पाण्यात वाहून गेल्याचे दिसते आहे. मुंबईवरून कोकणात जाणारी आणि कोकणातून मुंबईकडे येणारी रेल्वे वाहतूक विस्कळीत झाली आहे. अनेक रेल्वेगाड्या पूर्णतः रद्द करण्यात आहेत तर काही रेल्वेगाड्यांचे मार्ग बदलले आहेत. त्यामुळे प्रवाशांच्या सोयीसाठी एसटी महामंडळाने विशेष बस सोडण्याची मागणी कोकण रेल्वे प्रशासनाकडून करण्यात आली आहे.

मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या गरीब रथ एक्स्प्रेसच्या सावंतवाडी येथे थांबलेल्या रेल्वे प्रवाशांकरिता १६ बसची मागणी कोकण रेल्वे प्रशासनातर्फे केली आहे. तर, मंगळुरू एक्स्प्रेसच्या कणकवली येथे थांबलेल्या रेल्वेतील प्रवाशांकरीता १७ बसची मागणी केली आहे.

पान २ वर

## भाजपाच्या रथाला महाराष्ट्राने रोखले, लोकसभेचे निकाल डबल इंजिन सरकारला इशारा - अलका लांबा

■ विधानसभा निवडणुकीसाठी प्रत्येक बुथवर किमान एक महिला अध्यक्ष नियुक्त करा.

■ महिला प्रदेश काँग्रेसच्या विस्तारित कार्यकारिणीची बैठक टिळक भवनमध्ये संपन्न.



● मुंबई, विशाल कारंडे :

महाराष्ट्र एक मोठे राज्य असून एक मजबूत संघटनच निवडणुका लढून जिंकू शकते त्यासाठी संघटन सशक्त असले पाहिजे. महिलांची लोकसंख्या ५० टक्के आहे, ही नारीशक्ती निवडणुकीतही तितकीच महत्वाची आहे. लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्राने विजयाचा मार्ग आखून दिला आहे. भारतीय जनता पक्षाने ४०० पारचा नारा दिला होता त्याला रोखण्याचे काम महाराष्ट्राने केले असून लोकसभेचा निकाल हा राज्यातील डबल इंजिनच्या सरकारला इशारा आहे, असे अखिल भारतीय महिला काँग्रेसच्या अध्यक्ष अलका लांबा यांनी म्हटले आहे.

टिळक भवनमध्ये आयोजित महिला प्रदेश काँग्रेसच्या विस्तारित कार्यकारिणीच्या बैठकीत अलका लांबा बोलत होत्या, त्या पुढे म्हणाल्या की, संघटन मजबूत करण्यासाठी सक्रीय होऊन काम करा, पक्षासाठी वेळ द्या, प्रचार व प्रसाराच्या कामात झोकून दिले पाहिजे. आजचे जग सोशल मीडियाचे असून या माध्यमातून तुमचा आवाज एका मिनिटात जगाच्या कानाकोपऱ्यात पोहचतो. देशात ७० कोटी महिला आहेत, त्यांचा आवाज बना, विधानसभा निवडणुकीला आता काही दिवसच शिल्लक आहेत. एका बुथवर कमित कमी एक महिला अध्यक्ष नियुक्त केली पाहिजे. तीन विधानसभेच्या निवडणुकीमध्ये महिला काँग्रेसने जोमाने काम करा व काँग्रेसची सत्ता आणा असे आवाहन अलका लांबा यांनी केले.

पान २ वर

## संपादकीय

# नाही भाषांतर पुरेसे

राजधानीत जुन्याच गुन्ह्यासाठी जुन्याच गुन्हेगारावर नव्या संहितेखाली नव्या व्हिडीओ-पुरावा पद्धतीने गुन्हा नोंदवून १ जुलै रोजी नव्या संहितेचे 'उद्घाटन' करण्यात आले. छान. संसदेत त्यासाठी मध्यरात्री एखादे विशेष अधिवेशन वगैरे बोलावले गेले नाही हेही छान. इतके दिवस आपल्याकडे ब्रिटिश-कालीन 'क्रिमिनल प्रोसिजर कोड'चा अंमल होता. स्वातंत्र्य मिळून इतकी वर्षे झाली तरी अजूनही टिकून असलेले हे साहेबी अस्तित्व पुसून टाकणे तसे गरजेचे होतेच. ती गरज या नव्या संहितेमुळे पूर्ण होईल. यासाठी नवी संहिता तयार करण्याचा प्रयत्न गेली चार वर्षे सुरू होता. खुद्द गृहमंत्री अमित शहा यांनी या संदर्भात शब्दश: शेकडो बैठका घेतल्या आणि तज्ज्ञांशी चर्चा केली. आता अखेर ही नवी दंड संहिता अमलात येत असून त्यानुसार १८६० सालची 'भारतीय दंड संहिता', १८९८ची गुन्हेगारी प्रक्रिया संहिता आणि १८७२चा 'भारतीय पुरावा कायदा' यांच्या जागी अनुक्रमे भारतीय न्याय संहिता, भारतीय नागरिक सुरक्षा संहिता आणि भारतीय पुरावा कायदा हे तीन कायदे अस्तित्वात येतील.

काळाच्या ओघात जशी गुन्हेगारी बदलते तसेच गुन्हेगारी कायदेही बदलणे गरजेचे असते. विद्यमान काळात झुंडबळी, लैंगिक गुन्हेगारी, दहशतवाद इत्यादी गुन्ह्यांत वाढ आणि बदल झालेला आहे. नव्या कायद्यांत याची रास्त दखल घेऊन त्याप्रमाणे कायद्यांची रचना करण्यात आली आहे. विद्यमान कायदे जेव्हा अस्तित्वात आले तेव्हा अस्तित्वात नसलेले गुन्हे आता घडू आणि वाढूही लागलेले आहेत. त्यांचा समावेश या नव्या रचनेत करण्याची गरज होती. नवी संहिता ती पूर्ण करते. तसेच अलीकडच्या काळात इलेक्ट्रॉनिक उपकरणांचा आपल्या जगण्यातील वापर लक्षात घेता गुन्हेगारी हाताळणीतही त्यांचा अधिकाधिक वापर कसा वाढेल याचा विचार करण्याची आवश्यकता होती. तो या नव्या संहितेत झालेला आहे. यापुढे साक्षी-पुरावे आदींसाठी आता इलेक्ट्रॉनिक आयुधांची अधिक मदत घेता येईल. विद्यमान व्यवस्थेत गुन्हा घडला त्याची हद्द हा प्रकार मोठा कटकटीचा असतो. नव्या कायद्यांत त्या अनुषंगाने सुधारणा आहेत. नव्या व्यवस्थेत फौजदारी खटल्यांमध्ये युक्तिवाद पूर्ण झाल्यानंतर एक ते दीड महिन्याच्या कालावधीत निर्णय सुनावण्याची तरतूद आहे. ती योग्यच. तसेच न्यायालयात पहिल्या सुनावणीनंतर ६० दिवसांच्या आत आरोपपत्र दाखल करणे बंधनकारक आहे. नव्या व्यवस्थेत संघटित गुन्हेगारी, झुंडबळी, दहशतवाद यांची स्पष्ट फोड करून सांगण्यात आली असून गुन्हेगारांची देशांतर्गत तसेच देशाबाहेरीलही संपत्ती जप्त करण्याचे अधिकार व्यवस्थेला असतील. साक्षीदार ही आपल्याकडील सर्वात मोठी डोकेदुखी. एक तर बऱ्याच गुन्ह्यांबाबत आपल्याकडे साक्षीदार मिळत नाहीत, मिळाले तरी शेवटपर्यंत टिकत नाहीत, टिकले तरी मध्येच हे आपली साक्ष बदलणारच नाहीत याची हमी नाही, अशी परिस्थिती. ती बदलण्याचा प्रयत्न या नव्या व्यवस्थेत असेल.

तथापि या नव्या संहितेत 'राजद्रोहा'सारख्या कालबाह्य गुन्ह्यांस नव्या रूपात जिवंत ठेवण्यात आले आहे. हा नवा कायदा फक्त 'राजद्रोह' शब्द बदलतो. पण अशा आरोपाखाली गुन्हा नोंदवण्याचा अधिकार उलट नव्या कायद्यात अधिक व्यापक करण्यात आलेला आहे. ''देशाच्या सार्वभौमत्व, एकता आणि अखंडता यांस आव्हान'' हे नव्या संहितेतील १५०व्या कलमानुसार गुन्हा असेल. ते ठीक. पण ''सार्वभौमत्व, एकता, अखंडता'' यांस आव्हान देणारी कृती कोणती हे ठरवण्याचा सर्वाधिकार सरकारकडेच असणार आहे. तसेच सरकारी मानसिकताही तीच असणार आहे. म्हणून केवळ 'राजद्रोह' हा शब्दप्रयोग नाही म्हणून नवी संहिता आधुनिक ठरत नाही. एखादा कायदा आधुनिक आहे की मागास हे त्यातील शब्दप्रयोगापेक्षा त्या कायद्याचा वापर करणाऱ्याच्या मानसिकतेवरून ठरते. म्हणून हे कायदे बदलले म्हणून या मानसिकतेत बदल झाला असे मानण्याची गरज नाही.



### आजची चित्रोळी

तर एक होती चिऊताई
चिमण्यासह बागेत जाई
बागेत होती फुलं छान
हरपून गेलं तिचं भान

**मुकुंद कुलकर्णी, कन्नमवार नगर, विक्रोळी, मुंबई**

## पान १ वरून...

### दहावी, बारावीची पुरवणी परीक्षा आजपासून

फेब्रुवारी-मार्च २०२४च्या परीक्षेप्रमाणेच परीक्षेच्या निर्धारित वेळेनंतर दहा मिनिटे वाढवून देण्यात आली आहे. तसेच पुरवणी परीक्षेतही प्रात्यक्षिक, तोंडी, अंतर्गत मूल्यमापन, श्रेणी परीक्षांचे गुण ऑनलाइन भरून घेतले जाणार आहेत, अशी माहिती राज्य मंडळाच्या सचिव अनुराधा ओक यांनी दिली.

यंदा दहावीसाठी २८ हजार ९७६ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. त्यात २० हजार ३७० मुले, ६ हजार ६०५ मुली, एक तृतीयपंथी विद्यार्थ्याचा समावेश आहे. तर बारावीसाठी ५६ हजार ८४५ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. त्यात ३६ हजार ५९० मुले, २० हजार २५० मुली, पाच तृतीयपंथी विद्यार्थ्यांचा समावेश असल्याची माहिती राज्य मंडळाने दिली. गेल्यावर्षी दहावीसाठी ४९ हजार ४६८, बारावीच्या ७० हजार ४६२ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यामुळे गेल्यावर्षीच्या तुलनेत यंदा दहावी आणि बारावीच्या पुरवणी परीक्षेच्या विद्यार्थी नोंदणीत घट झाल्याचे स्पष्ट झाले आहे.

### मरीन ड्राईव्ह येथील समुद्रात तरूणीची आत्महत्या

सकाळी कामावर जात असल्याचे सांगून ती घरातून बाहेर पडली. त्यानंतर तिने थेट मरीन ड्राईव्ह स्थानक गाठले. तेथून इंटरकॉन्टिनेन्टल हॉटेल समोरील चौपाटीवरील समुद्रात ती उतरली. सकाळी ११ ते १२ च्या दरम्यान पोलिसांनी महिलेला बाहेर काढण्यासाठी शोध मोहिम राबवली होती. प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, महिला तेथे आली व तिने बॅग खाली ठेवली. त्यानंतर तिने समुद्रात स्वतःला झोकून दिले. तरूणीचा मोबाईल पोलिसांना सापडला असून त्यातील व्हॉट्सअॅप चॅटींगवरून वैयक्तीत कारणास्तव तिने आत्महत्या केल्याचे स्पष्ट झाले आहे, असे सूत्रांनी सांगितले. याबाबत मरीन ड्राईव्ह पोलीस अधिक तपास करत आहेत.

### अंगणवाडी मदतनीसांची १४ हजार रिक्त पदे लवकरच...

शहरी प्रकल्पातील कार्यरत अंगणवाडी केंद्रांमध्ये ७८३ अंगणवाडी मदतनीसांची रिक्त पदे आहेत. त्यानुसार ३१ ऑगस्ट २०२४ अखेरपर्यंत राज्यातील १४ हजार ६९० मदतनीसांची रिक्त पदे भरण्यात यावीत, अशा सूचना सर्व जिल्हा व प्रकल्पस्तरावर देण्यात आल्या आहेत.
याबाबतची जाहिरात लवकरच प्रसिद्ध होणार आहे. इच्छुक महिलांनी अर्ज सादर करावेत, असे आवाहन मंत्री कु. तटकरे यांनी केले आहे.

### हवामान खात्याचा 'हायअलर्ट', १८ जुलैपर्यंत राज्यात...

तसेच, मुंबई, ठाणे, पालघर, भागांत 'येलो अलर्ट' देण्यात आला आहे.
मराठवाडा तसेच विदर्भातील बहुतांश ठिकाणी मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, परभणी आणि धाराशिव जिल्ह्यातील तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याचा अंदाज आहे. तर विदर्भातील अमरावती, अकोला, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर तसेच नागपूर जिल्ह्यात मुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. ढगांच्या गडगडाटासह आणि विजांच्या कडकडाटासह मुसळधार पावसाचा अंदाज देण्यात आला आहे. तर याचवेळी वाऱ्याचा वेगळी ताशी ४० ते ५० किलोमीटर राहील, असा अंदाज आहे. केरळ, कर्नाटक आणि गोव्याच्या काही भागांमध्ये पुढील काही दिवसांत २० सेंटीमीटरपेक्षा जास्त पाऊस पडेल. दरम्यान, सातारा, कोल्हापूर, सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी या महाराष्ट्रातील चार जिल्ह्यांमध्ये मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर 'रेड अलर्ट' देण्यात आला आहे. महाराष्ट्रात गेल्या आठवड्यापासून सर्वत्रच मुसळधार पाऊस कोसळत आहे. मुंबई, पुणे शहर पावसाच्या पाण्याने तुंबले. तर मराठवाडा आणि विदर्भातील काही भागात देखील पावसाने जोर पकडला आहे. कोकणातही मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे.

### विशाळगड हिंसाचारावर शाहू महाराजांकडून तीव्र निषेध

त्यामुळे शाहू महाराज यांनी प्रशासनावर ताशेरे ओढले. जे घडलं त्याच मी समर्थन करत नाही पण कशामुळे हे घडलं याचं सरकारने आत्मपरीक्षण करावं.

दरम्यान, पोलिसांनी गुन्हा दाखल केल्याचे समजताच संभाजीराजे शाहूवाडी पोलिस स्टेशनला हजर झाले आहेत. मात्र, त्यांनी पोलिस थेट माहिती देत नसल्याचा आरोप केला आहे. पालकमंत्र्यांच्या आदेशनं गुन्हा दाखल करायचा आहे का? अशी विचारणा त्यांनी केली. ते म्हणाले की, माझ्यावर गुन्हा दाखल केला असे समजलं म्हणून मी स्वतः पोलीस ठाण्यात आलो. शाहूवाडी पोलिस ठाण्यात दीड तासापासून चर्चा झाली. सगळ्या घटनेला मला जबाबदार धरून मला अटक करा, शिवभक्तांना त्रास देऊ नका. गुन्हा दाखल केला असाल तर मी इथंच थांबतो, पण त्यांनी कोणतीही प्रतिक्रिया दिली नसल्याचे संभाजीराजे म्हणाले.

दरम्यान, विशाळगडावर पोलीस अधीक्षकांनी अतिक्रमण काढण्यास सुरुवात झाली असे सांगितलं आहे. सुरुवात करताना हिंदूंनी केलेली अतिक्रमणे काढली, त्यामुळे याला जातीय रंग देऊ नका, असे ते म्हणाले.

संभाजीराजे यांनी कोल्हापूरचे पालकमंत्री हसन मुश्रीफ यांच्यावर जोरदार टीका केली आहे. माझ्या पुरोगामित्वावर प्रश्न चिन्ह करता, पण अतिरेकी यासिन भटकळ तिथं राहिला होता त्यावेळी कुठं पुरोगामी कुठं गेलं होतं? अशी विचारणा त्यांनी केली. दोन समाजात भांडण लावू नये

### नियोजनाच्या अभावामुळे मुंबई गोवा महामार्गाच्या...

आजही अपूर्ण असलेल्या या मुंबई गोवा महामार्गाच्या संपूर्ण कामाबाबत कोकणवासीयांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे. ऐन पावसाळ्यात कोकणामध्ये मोठ्या प्रमाणात पर्जन्यवृष्टी होत असते या धुवाधार पावसामुळे पाण्याचा निचरा करण्यासाठी योग्य नियोजन करण्याची गरज होती मात्र मुंबई गोवा महामार्गावर आजही अनेक ठिकाणी पावसाचे पाणी साचून राहत आहे. महाड शहरा नजीक नातेखिंड येथून थेट चांभार खिंड ते नडगाव पर्यंत ठीक ठिकाणी उड्डाणपूलांची निर्मिती केली आहे. या उड्डाण पुलावर पाणी साचून राहू नये म्हणून उड्डाणपुलावरून पाईप टाकण्यात आले आहेत. हे पाईप खाली असलेल्या रस्त्यालगत गटारामध्ये सोडणे अपेक्षित होते मात्र पैसा वाचवण्याचे हेतूने संबंधित ठेकेदाराने हे पाईप गटारापासून काही अंतरावर तसेच सोडून दिले आहेत. यामुळे उड्डाण पुलावरील पाणी खाली असलेल्या गटारावरील स्लॅबवर कोसळत आहे आणि थेट रस्त्यांवर वाहत आहे. यामुळे स्थानिक नागरिकांचे प्रचंड हाल होत आहेत.

मुंबई गोवा महामार्गावर नाते खिंड येथे बांधण्यात आलेल्या उड्डाणपुलाखाली मोठ्या प्रमाणावर पाणी वाहत असताना दिसून येत आहे. यामुळे रस्त्यावर पाण्याचा नाला वाहत असल्याचे चित्र निर्माण झाले आहे. पाण्याबरोबर येणाऱ्या दगडी कचरा हा रस्त्यावर साचून राहत असल्याने पायी चालणाऱ्या नागरिकांना याचा त्रास होत आहे.

मुंबई गोवा महामार्गावर गेली अनेक वर्ष रस्ता पूर्ण करण्याचे काम सुरू आहे. कोकणात जाणारे या महामार्गावर ठिकठिकाणी उड्डाणपूलांची निर्मिती केली आहे. महामार्गाच्या दुसऱ्या टप्प्यात इंदापूर ते कशेडी दरम्यान असणाऱ्या लोणेरे, टेमपाले, वीर, दासगाव, वहूर, गांधार पाले, नातेखिंड, चांभार खिंड, नडगाव, चांढवे, पार्ले, पोलादपूर या गावांजवळ उड्डाणपूल बांधले आहेत. या उड्डाणपणामुळे आधीच गावांचे मोठे नुकसान झाले आहे. गावांची ओळख पुसली गेली असून स्थानिक नागरिकांच्या व्यवसायावर देखील मोठा परिणाम झाला आहे. त्यातच महामार्गाच्या कामामध्ये काडीची गुणवत्ता नसल्याने महामार्ग बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांच्या कामाबाबत आश्चर्य व्यक्त होत आहे. नियमानुसार उड्डाण पुलावरील पाणी घालून जाणाऱ्या रस्त्याकडेला असलेल्या गटारात सोडणे आवश्यक होते मात्र सदर पाईप गटारामध्ये न सोडता अधांतरी सोडून दिले आहेत. अनेक ठिकाणी हे पाईप देखील तुटून खाली पडले आहेत. उड्डाणपुलावर साचलेला कचरा या पाईप मधून अडकल्याने पाण्याचा निचरा होत नसल्याचे देखील दिसून येत आहे. तसेच महामार्गाच्या दुभाजकामध्ये देखील पाण्याचा निचरा करणारी व्यवस्था न केल्याने महामार्गाच्या एका बाजूकडील पाणी दुसऱ्या बाजूकडे रस्त्यावर येऊन वाहू लागले आहे. पावसाळी पाणी रस्त्यावर साचल्याने अपघाताची देखील शक्यता निर्माण होत आहे. याबाबत स्थानिक नागरिकांमध्ये प्रचंड नाराजी निर्माण झाली आहे. एकंदरीत आंधळे दळतय कुत्रा पीठ खातंय राष्ट्रीय महामार्ग खात्याचा कार पार्क मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गावरील रायगड रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यात पाहण्यास मिळत आहे.

### ठाण्यात साथीचे आजार असतानाही घोडबंदररोडवरील...

इतकेच नव्हे, तर प्रभाग क्र. २ मधील घोडबंदर रोडवरील ब्रहांड, पातलीपाडा, हिरानंदानी इस्टेट, कोलशेत भागात दररोज सकाळी कचरा उचलण्यासाठी येणाऱ्या घंटागाड्या बंद झाल्या आहेत. परिणामी प्रत्येक सोसायटीच्या बाहेर ड्रममध्ये कचरा साचला आहे. काही ठिकाणी कचऱ्याने ड्रम भरल्यामुळे रस्त्यावर कचरा पसरत आहे. त्यात पावसामुळे ओला कचरा कुजण्याची भीती आहे. या परिस्थितीत रोगाला आमंत्रण मिळण्याची भीती आहे, याकडे मनोहर डुंबरे यांनी पत्रात लक्ष वेधले आहे. महापालिकेच्या आरोग्य विभागात माहिती घेतल्यानंतर, सी. पी. तलाव येथील कचरा संकलन केंद्राबाहेर कचऱ्याने भरलेल्या डंपरची रांग लागली असल्याचे निदर्शनास आले. सी. पी. तलाव येथे कचऱ्याचे ढीग असून, तेथून कचरा डंपिंग ग्राऊंडमध्ये नेला जात नाही. त्यामुळे डंपरमधील कचरा उतरवून घेतलेला नाही. या गंभीर परिस्थितीमुळे शहरात कचरा वाहून नेण्यासाठी घंटागाडी येत नाहीत, अशी माहिती मनोहर डुंबरे यांनी दिली. तसेच आयुक्तांना तातडीने दखल घेण्याची विनंती केली आहे.

### रेल्वे प्रवाशांच्या समस्येवरून खा. सुरेश म्हात्रेंचा...

छोट्या-छोट्या समस्याही सोडवता येत नाहीत
अनेक वर्षांपासून रेल्वे प्रवासी संघटना, प्रवाशी या समस्यांबाबत तक्रारी करत आहेत, मात्र अद्यापही समस्या सुटल्या नसल्याने म्हात्रे यांनी अधिकाऱ्यांना चांगलेच धारेवर धरले. लोकलच्या फेऱ्या वाढवणे हा मोठा विषय आहे, मात्र रेल्वे स्टेशनवर स्वच्छतागृह उपलब्ध करून देणे, फेरीवाल्यांचा अतिक्रमण हे छोटे छोटे विषय अद्याप सुटलेले नाहीत असे म्हात्रे यांनी सांगितले. या समस्या कधी सुटतील याचा कालावधी मला सांगा, पुढच्या आठवड्यात मी पुन्हा रेल्वे स्टेशनची पाहणी करणार असल्याचे म्हात्रे यांनी सांगितले.
हिंमत असेल तर विधानसभा निवडणूक लढवून दाखवा
भिवंडी लोकसभा निवडणुकीत पराभव झाल्यानंतर भाजपचे माजी केंद्रीय मंत्री विधानसभा निवडणुकीच्या रिंगणात उतरणार असल्याची चर्चा भिवंडी लोकसभा मतदारसंघात रंगली आहे. याबाबत बोलताना विद्यमान खासदार सुरेश मात्रे यांनी माजी केंद्रीय मंत्री कपिल पाटील यांना थेट आव्हान दिलं. यावेळी बोलताना खासदार म्हात्रे म्हणाले की, "मी लोकसभेतदेखील चॅलेंज केलं होतं, आता देखील करतोय. लोकांनी कपिल पाटील यांना स्पष्ट नाकारलं, कपिल पाटील यांनी सत्तेत असताना काय केलं? मुरबाड असेल कल्याण पश्चिम असेल, कपिल पाटील यांनी उभं राहून दाखवावं, पुन्हा जनताच चारीमुंड्या चित करून दाखवेल."

### कोकण रेल्वेत अडकलेल्या प्रवाशांना एसटीचा आधार,...

तसेच कुडाळ येथे मंगला एक्स्प्रेसच्या आणि वैभववाडी येथे मत्स्यगंधा एक्स्प्रेसच्या प्रवाशांसाठी विशेष बस उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

या सर्व बस मुंबई दिशेने जाणार असून सावंतवाडी, वेंगुर्ला, कणकवली, देवगड आगारातून विशेष बसची व्यवस्था करण्यात आली आहे. कोकण रेल्वे दिवाणखवटी येथे बोगदयाजवळ दरड कोसळल्याने मांडवी एक्स्प्रेस आणि दिवा पॅसेंजरमधील प्रवाशांना मुंबईला सोडण्यासाठी रत्नागिरी स्थानकातून ४० बस, चिपळूण स्थानकातून १८ बस, खेड स्थानकातून १० बस उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत, अशी माहिती एसटी महामंडळाकडून देण्यात आली.

### भाजपाच्या रथाला महाराष्ट्राने रोखले, लोकसभेचे निकाल...

महिलांवरील कौटुंबिक हिंसाचार, अत्याचार व अन्यायवरही अलका लांबा यांनी भाष्य केले. कल्याणमध्ये एका महिलेवर सामुहिक बलात्कार करुन तिची हत्या करण्यात आली यावर त्यांनी संताप व्यक्त केला. महिलांवरील अत्याचारांच्या घटनांमध्ये वाढ होत असून महिला काँग्रेसच्या पदाधिकारी नात्याने महिलांचा आवाज बना असेही अलका लांबा म्हणाल्या.

यावेळी महिला काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्ष संध्या सव्वालाखे म्हणाल्या की, काँग्रेस पक्षात काम करणाऱ्यांना योग्य ती संधी दिली जाते, महिला काँग्रेसमध्ये ज्यांनी उल्लेखनीय काम केले आहे त्यांचा विधानसभा, महानगरपालिका, नगरपालिका निवडणुकीत उमेदवारी देताना नक्कीच विचार केला जातो. लोकसभा निवडणुकीप्रमाणेच अधिक जोमाने व सक्रीय होऊन काम केले तर विधानसभा निवडणुकीतही काँग्रेस पक्षाचे सरकार येण्यापासून कोणीही रोखू शकणार नाही. या बैठकीला अखिल भारतीय महिला काँग्रेसच्या अध्यक्ष अलका लांबा, महिला प्रदेशाध्यक्ष संध्या सव्वालाखे, यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

# डोनाल्ड ट्रम्प यांचे प्राण वाचण्याचा आणि भगवान जगन्नाथ यांच्या रथयात्रेचा नेमका संबंध काय?

अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यावर शनिवारी प्राणघातक हल्ला झाला. या हल्ल्यात त्यांना कानाला दुखापत झाली. त्यांच्या उजव्या कानाच्या वरच्या भागाला गोळी लागली. परंतु, ते या हल्ल्यातून बचावले. पेनसिल्व्हेनियातील बटलर येथे एका सभेत ते बोलत होते, तेव्हाच त्यांच्यावर हा हल्ला करण्यात आला. २० वर्षीय शूटर थॉमस मॅथ्यू क्रुक्सने हा हल्ला केला असून या हल्ल्यात सभेत उपस्थित असणाऱ्या माजी अग्निशमन प्रमुखाने आपले प्राण गमावले, तर अन्य दोन जण गंभीर जखमी झाले. 'न्यूयॉर्क टाईम्स'चे ज्येष्ठ छायाचित्रकार डग मिल्स यांनी ट्रम्प यांच्यावर झालेल्या हल्ल्याचा नेमका क्षण कॅमेऱ्यात कैद केला.

हल्ला झाला अगदी त्याच क्षणी ट्रम्प यांनी आपले डोके फिरवले त्यामुळेच त्यांचा जीव वाचला. बरेच लोक असा दावा करत आहेत की, देवाच्या कृपेनेच त्यांचा जीव वाचला. कोलकाता इंटरनॅशनल सोसायटी फॉर कृष्णा चेतना (इस्कॉन) चे उपाध्यक्ष राधारमण दास यांनी डोनाल्ड ट्रम्प आणि भगवान जगन्नाथ यांच्यातील संबंधांकडे लक्ष वेधल्याने अनेकांच्या भुवया उंचवल्या आहेत. त्यांनी नेमका काय दावा केला? डोनाल्ड ट्रम्प यांचे प्राण वाचण्याचा आणि भगवान जगन्नाथ यांच्या रथयात्रेचा नेमका संबंध काय? याविषयी सविस्तर जाणून घेऊ.

"भगवान जगन्नाथाच्या कृपेने ट्रम्प बचावले"

छायाचित्रकार मिल्सने हल्ल्याचा फोटो सोशल मीडियावर शेअर केला आणि म्हटले की, ट्रम्प जर वळले नसते तर त्याच क्षणी त्यांचा मृत्यू झाला असता. याला 'दैवी हस्तक्षेप' असे संबोधले गेले. यावरच प्रतिक्रिया देत राधारमण दास म्हणाले, "होय, निश्चितच हा दैवी हस्तक्षेप आहे. जुलै १९७६ मध्ये, रथ बांधण्यासाठी डोनाल्ड ट्रम्प यांनी इस्कॉनच्या भाविकांना आपले ट्रेन यार्ड विनामूल्य देऊन त्यांची मदत केली होती. आज सर्वत्र रथयात्रा उत्सव साजरा होत आहे. याचदरम्यान ट्रम्प यांच्यावर हल्ला झाला आणि भगवान जगन्नाथाच्या कृपेने या हल्ल्यातून ते बचावले."

१९७६ मध्ये ट्रम्प यांच्या मदतीने न्यूयॉर्कमधील फिफ्थ अव्हेन्यू येथे भगवान जगन्नाथांची रथयात्रा काढणे शक्य झाले. यात एक मनोरंजक गोष्ट म्हणजे, ट्रम्प यार्डमध्ये जो रथ तयार करण्यात



आला, ते मॉडेल कोलकाता रथयात्रेसाठी वापरले गेले आणि भगवान जगन्नाथ आणि बलराम यांचे रथ तयार करण्यात आले. रथ बांधण्यासाठी न्यूयॉर्कमध्ये फिफ्थ अव्हेन्यूजवळ एक मोठी, रिकामी जागा शोधणे ही एक समस्या होती. इस्कॉनच्या भक्तांनी संस्थेच्या १० व्या वर्धापन दिनानिमित्त न्यूयॉर्कमध्ये एक उत्तम रथयात्रा आयोजित करण्याचा विचार केला होता, परंतु जागेच्या अनुपलब्धतेमुळे हा विचार व्यर्थ ठरला.

१९७६ चा तो किस्सा

"इस्कॉनचे भक्त तोसन कृष्ण दास यांना मॅनहॅटनमधील पोलिस प्रमुखांकडून फिफ्थ अव्हेन्यू येथे परेड आयोजित करण्यास होकार देण्यात आला. हे चमत्कारापेक्षा कमी नव्हते. पण, भव्य लाकडी रथ बांधण्यासाठी आम्हाला परेड मार्गाच्या सुरुवातीच्या ठिकाणाजवळ एक रिकामी जागा हवी होती. आम्ही अनेकांना विचारले, पण प्रत्येकाने नकार दिला. त्यांना विमा जोखीम इत्यादींबद्दल चिंता होती," असे दास म्हणाले. संपर्क साधल्यानंतर, जवळजवळ प्रत्येक मोठ्या व्यावसायिकाने सांगितले की, ते पेनसिल्व्हेनिया रेल्वे यार्डमधील त्यांची मालमत्ता विकण्याच्या प्रक्रियेत आहेत, हे रथ बांधण्यासाठी अगदी योग्य स्थान होते. ट्रम्प यांनी जुने रेल्वे यार्ड विकत घेतल्याचे इस्कॉनच्या भाविकांना काही दिवसांनंतर समजले.

त्यानंतर भाविकांनी प्रेझेंटेशन बॉक्स आणि महाप्रसादाची टोपली त्यांच्या कार्यालयात नेली. त्यांनी ते घेतले. ट्रम्प यांच्या सेक्रेटरीने भाविकांना फोन करून माहिती दिली, "काय झाले ते मला माहीत नाही, पण त्यांनी तुमचे पत्र वाचले, तुम्ही दिलेला प्रसाद खाल्ला आणि लगेच होकार दिला." सेक्रेटरी पुढे म्हणाली, "या आणि त्यांनी स्वाक्षरी केलेले पत्र घेऊन जा." या ठिकाणी विशाल रथांची रचना इस्कॉनचे अभियंता आणि भक्त जयनंद प्रभू यांनी केली होती. मयेश्वर दासा म्हणून ओळखले जाणारे गॅरी विल्यम रॉबर्ट्स दोन वर्षांनी कोलकाता येथे गेले आणि त्यांनी १९७८ च्या कोलकाता रथयात्रेत वापरलेले रथांना अमेरिकेतील रथांप्रमाणे तयार केले.

जगन्नाथ रथयात्रा

ओडिशामध्ये होणारी जगन्नाथ रथयात्रा हा सर्वात जुना आणि सर्वात मोठा रथोत्सव मानला जातो. या प्रवासात भगवान जगन्नाथ स्वतः त्यांची बहीण सुभद्रा आणि भाऊ बलराम यांच्यासह त्यांच्या विशाल रथावर शहराचा फेरफटका मारतात; जिथे ते त्यांच्या मावशी गुंडीचा मातेच्या घरी सात दिवस विश्रांती घेतात. हा जगन्नाथ रथयात्रेचा मुख्य केंद्रबिंदू आहे. पहिला रथ भगवान बलरामांचा, मधला रथ बहीण सुभद्राचा आणि मागील रथ भगवान जगन्नाथाचा असतो. अशी आख्यायिका आहे की, ही परंपरा बाराव्या शतकात सुरू झाली. या रथयात्रा आषाढच्या महिन्यात जगभरातील शहरांमध्ये आयोजित केल्या जातात. भारतात या महिन्यात पावसाळ्याची सुरुवात होते.

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k. industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no. 12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist. Thane-401107, Maharashtra. Editor: Rakesh Shankar Gore. RNI REG. NO.: MAHBIL/2023/86118. Office contact no. 9702386118, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)

# वीज कामगारांच्या वेतन वाढ करारावर सह्या करण्यास नऊ कामगार संघटनांनी दिला नकार

कल्याण : यंत्रचालक व तांत्रीक तृतीय व चतुर्थ श्रेणीच्या तांत्रिक कर्मचाऱ्यांवरी अन्याय अमान्य असून अलीकडील बैठकीमध्ये दिलेले शब्द प्रशासनाने अंतिम बैठकीत न पाळल्याचा आरोप करत वीज कामगारांच्या वेतन वाढ करारावर सह्या करण्यास नऊ कामगार संघटनांनी नकार दिला आहे.

तीनही वीज कंपनीतील किमान 68 हजार वीज कामगारांना 1 एप्रिल 2023 पासून देय असणाऱ्या पगारवाढ करारा बाबत, किमान आठ बैठका झाल्यात, पैकी 4 जुलै 2024 रोजी महाराष्ट्राच्या मुख्य सचिव सुजाता सैनिक यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सर्व संघटना समवेतच्या बैठकीत सूत्रधारी कंपनीच्या व्यवस्थापकीय संचालक शुक्ला, महावितरणचे व्यवस्थापकिय संचालक लोकेशचंद्र, महापारेषणचे व्यवस्थापकीय संचालक संजीवकुमार, महा निर्मितीचे व्यवस्थापकीय संचालक अन्बलगन व अन्य संचालक मंडळी यांच्या समवेत झालेल्या बैठकीत प्रशासनाने कंपनीची आर्थिक परिस्थिती चांगली नसल्याने मूळ पगारात 15 टक्के पेक्षा जास्त वाढ देऊ शक्य नसल्याचे स्पष्ट केले. मात्र अस्तित्वात असणाऱ्या भत्यांमध्ये 100 टक्के वाढ करीत असल्याचे सांगितले, या पैकी भत्यांमध्ये १०० टक्के वाढीवर सर्वांचे एकमत झाले.



मात्र प्रशासनाने महावितरणला ५२०० कोटीचा दाखविलेल्या तोटयावर भाई जगताप यांनी कडक हरकत घेत हा महावितरणला तोटा झालेला नसून तत्कालीन व्यवस्थापकीय संचालक यांच्या चुकीमुळे अदानी पॉवर लि. ला 5666 कोटी रुपये पेन्लटी व दंड भरावा लागल्यामुळे तोटा दिसत आहे. तर तो तोटा नसून नफा आहे. या पेन्लटीला कामगार जबाबदार नाहीत. जे जबाबदार आहेत त्यांच्याकडून वसूल करा व कामगारांना द्या म्हणजे बॅलन्स शिटला आज दिसणारा तोटा तो नफा दिसेल. म्हणून ५२०० कोटी तोटा असतांना जर कंपनी 15 टक्के देऊ करीत आहे तर, पाच हजार कोटी नफा दिसल्यावर 15 अधिक 15 असे 30 टक्के वाढ कामगारांना द्या अशी मागणी माजी आमदार भाई जगताप यांनी करताच मुख्य सचिव, प्रधान ऊर्जा सचिव व चारही व्यवसथापकीय संचालक अव्वाक होऊन बघतच राहिले.

तृतीय व चतुर्थ श्रेणी तांत्रिक कामगारांना संघटनेने मूळ पगारात रु १००० वाढ मागितली होती ती मान्य झाली नाही. परंतू त्यांनी Ad-hoc भत्ता म्हणून दरमहा 1000 रु वेगळे देतो असे जाहीर केले ते संघटनेने अमान्य केले. मात्र हे हजार रुपये जर मूळ पगारात देत असेल तर आम्हाला मान्य असल्याचे संघटनेकडून सांगण्यात आले. दुसरी बाब म्हणजे अन्य भत्यात 100 टक्के वाढ देतो असे मान्य केलेली मागणी काही संघटनांच्या घातकी पणामुळे आता फक्त भत्यात 25 टक्के वाढ देतो सांगून प्रशासनाने गेल्या मीटिंग मध्ये दिलेला आपला शब्द फिरवला. परिणामी संघटनेत या मुळे चीड तयार झाली.

थोडक्यात तांत्रिक कर्मचाऱ्यांना मूळ पगारात 1000 रु वाढ न देणे, व भत्यात जाहीर केलेली 100 टक्केचा शब्द प्रशासनाने न पाळणे यामुळे महाराष्ट्र राज्य राष्ट्रीय वीज कामगार फेडरेशन , इंटकने शुक्रवारी बोलविलेल्या पगार वाढ करारावर सह्या न करण्याचा निर्णय घेतला व तो आजही कायम आहे. संघटने सोबत अजून नऊ संघटना आहेत. एकंदरीत नवीन पगार वाढ करार चर्चा पूर्णतः माजी आमदार भाई जगताप यांच्या खांद्यावर होती. पहिल्यापासून ते शेवटपर्यंत चर्चेचे केंद्र बिंदू भाई जगताप होते. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली झालेली बैठकीत जगताप यांनी वेतनवाढीची खरी प्रथम कोंडी फोडली.

## पेंढरकर कॉलेज वाचविण्यासाठी डोंबिवलीत निघाली महारॅली प्रशासक न नेमल्यास मंत्रालयात धडक देण्याचा दिला इशारा



कल्याण : पेंढरकर कॉलेज विनाअनुदानित करण्याच्या व्यवस्थापनाच्या निर्णयाच्या निषेधार्थ माजी विद्यार्थ्यांचे 'सेव्ह पेंढरकर कॉलेज' या मोहिमेंतर्गत साखळी उपोषण सुरू आहे. महिना उलटूनही शिक्षण विभाग, मुंबई विद्यापीठ, धर्मादाय आयुक्त प्रशासनाला जाग आली नाही. त्यांना जागे करण्यासाठी रविवारी पेंढरकर महाविद्यालय ते इंदिरा गांधी चौक अशी निषेध रॅली काढण्यात आली.शासक नेमला नाहीतर आंदोलन शिक्षण विभाग संचालक, मंत्रालय, कुलगुरूंच्या दालनापर्यंत पोहोचेल, असा इशारा आंदोलनाचे संयोजक माजी विद्यार्थी सोनू सुरवसे यांनी दिला. रॅली महाविद्यालयासमोरून पुढे घरडा सर्कल, शेलार चौक, टिळक पथ, फडके मार्ग, बाजीप्रभू चौक ते इंदिरा गांधी चौक अशी काढण्यात आली. रॅलीत शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी संघटना, रिक्षा संघटना, फळ-फूल-भाजी विक्रेत्यांच्या विविध संघटना, भारत मुक्ती मोर्चा, प्रोटॉन आदींसह मोठ्या संख्येने डोंबिवलीकर नागरिक सहभागी झाले होते. कॉम्रेड काळू कोमास्कर, संजय मांजरेकर, कॉंग्रेसचे स्थानिक नेते संतोष केणे, सामाजिक कार्यकर्ते सत्यवान म्हात्रे यांचीही उपस्थिती होती.

## नवी मुंबईतील ४०० हून अधिक सार्वजनिक व सामुदायिक शौचालये सफाईची सखोल स्वच्छता मोहीम

नवी मुंबई - "स्वच्छ भारत मिशन" अंतर्गत 'सफाई अपनाओ बिमारी भगाओ' हे अभियान नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने अत्यंत प्रभावीपणे राबविण्यासाठी आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली विविध स्वच्छता उपक्रमांत लोकसहभागावर भर दिला जात आहे. या अंतर्गत 'सखोल स्वच्छता मोहीमा' राबविण्यात येत असून दैनंदिन स्वच्छता होत असते अशा जागांवर अधिक बारकाईने प्रभावीरित्या सखोल स्वच्छता करण्यावर भर दिला जात आहे.

अशाच प्रकारची सखोल स्वच्छता मोहीम नमुंमपा क्षेत्रातील सार्वजनिक आणि सामुदायिक शौचालयांमध्ये एकाचवेळी राबविण्यात आली. आयुक्त महोदयांच्या मार्गदर्शनाखाली अतिरिक्त आयुक्त श्री.



सुनिल पवार व घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त डॉ. अजय गडदे यांच्या नियंत्रणाखाली परिमंडळ 1 उपआयुक्त श्री. सोमनाथ पोटरे व परिमंडळ 2 उपआयुक्त डॉ. कैलास गायकवाड यांच्या माध्यमातून आठही विभाग कार्यालय क्षेत्रातील 400 हून अधिक सार्वजनिक व सामुदायिक शौचालयांमध्ये ही सखोल स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

यामध्ये विभागांचे विभाग अधिकारी तथा सहा. आयुक्त डॉ.अमोल पालवे, श्री. सागर मोरे, श्री.भरत धांडे, श्री.सुनिल काठोळे, श्री.संजय तायडे, श्री.अशोक अहिरे व उपआयुक्त डॉ.कैलास गायकवाड यांनी आपापल्या विभागातील स्वच्छता अधिकारी, स्वच्छता निरीक्षक, अधिकारी – कर्मचारी, स्वच्छताकर्मीच्या सहयोगाने व स्थानिक स्वयंसेवी संस्था प्रतिनिधी व नागरिकांच्या सहभागातून शौचालयांची अंतर्गत स्वच्छता तसेच बाह्य परिसराची सखोल स्वच्छता केली. या विशेष सखोल स्वच्छता मोहीमेमुळे सार्वजनिक व सामुदायिक शौचालयांचे बदललेले रूप बघून नागरिकांकडून प्रशंसा करण्यात आली.

## कल्याण तालुक्यातील अणे - भिसोळ परिसरात वन महोत्सव निमित्ताने वृक्षारोपण कार्यक्रम !



मुरबाड - शासन वनविभाग वनपरिक्षेत्र कल्याण व संयुक्त वन व्यवस्थापन समिती यांच्या संयुक्त विद्यमाने दर वर्षाप्रमाणे वन महोत्सव निमित्ताने अने - भिसोळ येथील वनविभागाच्या जागेत उपस्थित पाहुणे यांच्या हस्ते पुजन करून झाडांचे वृक्षारोपण करण्यात आले, यावेळी दि. १३ जुलै २०२४ रोजी, राऊंड फॉरेस्ट ऑफिसर राजु शिंदे आणि कर्मचारी, वन परिक्षेत्र कल्याण. अने-भिसोळ सरपंच चंद्रकांत मोहोपे, कारुण्य ट्रस्ट बोर्ड ऑफ ट्रस्टी फा. जॉर्ज, संचालक फा. लिजो वेलियमकंडथील आणि संस्थेतील पदाधिकारी सि. मिनी अब्राहम, सि. ज्युली कलमकर, प्रकल्प समन्वयक किरण वाघमारे, निशिकांत रननावरे इतर कर्मचारी वर्ग व स्वयंसेवक उपस्थित होते. ाजू शिंदे सरांनी सांगितले की इथे झाडे लावणे फार गरजेचे आहे, कारण भविष्यात येतील मोर व इतर पशुपक्ष्यांना अन्न व निवारा मिळेल. त्यांनी भविष्यातील शेत तळयाच्या प्रकल्पाबद्दा देखील सांगितले जेणे करून कायमची पाण्याची सोय तेथील वृक्ष व पशुपक्ष्यांसाठी उपलब्ध होईल व त्यासाठी त्यांनी एकत्रित येऊन काम करण्यासाठी सुचवले. पाण्यासाठी पशुंच्या अपघाताचा गंभीर आकडा देखील त्यांनी सांगितला.

## आगरी साहित्य शाळेचे कोंडेश्वर येथे विविध पावसाळी उपक्रम

कल्याण : आगरी बोली भाषा साहित्य प्रचार व प्रसार तसेच तिचे जतन व्हावे यासाठी वसा घेतलेले कल्याणच्या सापाड गावातील आगरी कवी जयंत पाटील यांनी आगरी साहित्य शाळेचा व्हाटसप ग्रुप सुरू केला आहे. या समूहातील विद्यार्थ्यांची एकमेकांशी ओळख व्हावी, तसेच शाळेची एक सहल म्हणुन वेगवेगळे उपक्रम राबविण्याची अनोखी कल्पना आगरी साहित्यिक जयंत पाटील यांना सुचली त्यांनी बदलापुर जवळील कोंडेश्वर परिसरात हे उपक्रम घेतले.



रविवारी रानावनात हेलफाटा, आभ्यासिका सहल, चिखल भेट, आगरी बोली कवी संमेलन.. वृक्षारोपण या सारखे कार्यक्रम राबविण्यात आले. महादेवाचं दर्शन घेण्यात आले त्यानंतर तेथील फार्महाऊस वर आगरी कविसंमेलन, आगरी गाणी, स्नेह भोजन व मोलाचे सहकार्य करणाऱ्याचा सन्मान, सन्मानपत्र, आगरी अस्मिता विशेषांक तसेच कवी जयंत पाटील यांचा सुप्रसिद्ध आगरी बोलीतील कनगा हा काव्यसंग्रह देण्यात आला.

यावेळी मुंबई, नवी मुंबई, ठाणे, रायगड, अशा सागरी जिल्हय़ातून सदस्य लांबून सहभागी झाले होते. या समूहाचे प्रशासक जयंत पाटील यांनी संपूर्ण कार्यक्रमाची आखणी केली होती. अभ्यासिका सहल प्रमुख म्हणुन डॉ. शोभा पाटील, कवी संमेलन प्रमुख संदेश भोईर असे मान्यवर होते. दुर्वास धुळे यांचे मोलाचे सहकार्य या कार्यक्रमाला लागले. विकास पाटील, विनोद कोळी, जोगेंद्र जाधव, दीपेश भोईर, दिपेश साळुंके, विवेक तरे, नंदेश गावंड, तृप्ती गावंड, हरिश्चंद्र दळवी, नितुराज पाटील, राजेंद्र पाटील, सुनिल पाटील, युवराज पाटील, राजकुमार, अनिल नाईक, शशिकांत पाटील, जयेश म्हात्रे, नरेश खारीक, दिगंबर कवरे, विश्वनाथ गवळी, दिपेश पाटील यांनी सहभाग घेतला.

## गंधर्व गुरुकुलच्या काव्य वाचन स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद

कल्याण : गंधर्व गुरुकुलच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या काव्य वाचन स्पर्धेला भर पावसातही उत्स्फूर्त असा प्रतिसाद पहायला मिळाला. मुक्त छंदात विविध विषयांवर सादर केलेल्या कवितांना उपस्थितांनी मनमुराद अशी दाद देत या कार्यक्रमाचा आनंद लुटला.


खुली मराठी काव्य वाचन स्पर्धेचे आयोजन टिटवाळा येथील प्रथमेश मंगल कार्यालय या ठिकाणी शनिवारी करण्यात आले होते. या स्पर्धेत साधारण २५ च्या वर स्पर्धकांनी सहभाग नोंदवला होता. विशेष म्हणजे या दिवशी जोरदार पाऊस असताना देखील २२ स्पर्धकांनी हजेरी लावत आपली रचना सादर करत या कार्यक्रमात विशेष रंगत आणली. सहभागी स्पर्धकांनी छ. शिवाजी महाराज, आई, पाऊस, प्रेम यांसारख्या विविध विषयांवर दमदार कविता सदर करत



प्रेक्षकांची वाहवा मिळवली.

रत्नागिरी, गिरगाव-मुंबई, शहापूर, वासिंद, उल्हासनगर, भिवंडी, कल्याण आणि टिटवाळा येथील स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. या स्पर्धेसाठी सेवानिवृत्त शिक्षक व साहित्य क्षेत्रातील अनेक मानाचे पुरस्कार मिळाले. रमेश तारमळे हे परीक्षक म्हणून लाभले होते. एकूण तीन क्रमांक या स्पर्धेत काढण्यात आले. मिनल कांबळे यांना प्रथम, दुसरा क्रमांक विजय पिळकर, तर कुणाल जाधव यांना तिसरा क्रमांक मिळाला.

विजयी स्पर्धकांना गंधर्व गुरुकुलच्या वतीने स्मृतीचिन्हे आणि प्रमाणपत्र तर सहभागी स्पर्धकांना प्रमाणपत्र प्रदान करून गौरवण्यात आले. यावेळी गंधर्व गुरुकुलच्या संस्थापिका वैदेही नांदगावकर यांनी सांगितले की २०१६ साली एका लहानश्या कार्यक्रमाने गंधर्वची सुरुवात करण्यात आली होती. मात्र आज त्याला मिळणारा प्रतिसाद पाहून आमची ऊर्जा आणखी वाढली आहे. स्थानिक कलावंताना व्यासपीठ मिळावे या एकाच उद्देश्याने हा मंच स्थापन करण्यात आला होता आणि तो उद्देश आज सफल होताना दिसत आहे. या कार्यक्रमाच्या आयोजनासाठी गंधर्वचे प्रमोद नांदगावकर यांनी विशेष मेहनत घेत कार्यक्रम संपन्न केला. त्याचबरोबर संतोषी जाधव, लखन जगताप , मुकुंद नावकर, सुनील गोडांबे यांचे देखील विशेष सहकार्य लाभले.



मुरबाड - कल्याण या राष्ट्रीय महामार्गावर असलेल्या मुरबाड माळशेज घाटात पर्यटकांना बंदी असल्याकारणाने सध्या माळशेज घाटात पर्यटकांना शिवाय माळशेज सुन्न सुन्न असल्याचे चित्र दिसून येत आहे .तर सतत दोन दिवस माळशेज घाटात धुवांधार पाऊस पडत असल्याने घाटातील शुभ्र पांढरे धबधबे फेसळताना दिसत आहे त्यावेळी टिपलेले छायाचित्र.

## डोंबिवली रेल्वे स्थानकातील प्रवाशांचा जीवघेणा प्रवास, लोकल पकडण्यासाठी रेल्वे मार्गातून उड्या



डोंबिवली: डोंबिवली रेल्वे स्थानकातून प्रवाशांनी आपला जीव धोक्यात घालून प्रवास करू नये म्हणून मध्य रेल्वे प्रशासनाने फलाट क्रमांक एक ते पाचच्या दरम्यान रेल्वे मार्गालगत चार ते पाच फुटाचे लोखंडी रोधक उभे केले आहेत. तरीही अनेक प्रवासी स्वताच्या जीवाची पर्वा न करता लोकल पकडण्यासाठी रेल्वे मार्गात उड्या मारून लोखंडी रोधक ओलांडून लोकल पकडण्यासाठी धडपड करत आहेत.

दररोज सकाळ, संध्याकाळ हा प्रकार गर्दीच्या वेळेत सुरू असतो. अनेक प्रवासी हे लोखंडी रोधक ओलांडताना पडतात. डोंबिवली रेल्वे स्थानकात रेल्वे सुरक्षा जवान, स्थानक व्यवस्थापक तैनात असतात. तरीही त्यांच्याकडून या लोहमार्ग ओलांडणाऱ्या प्रवाशांवर कारवाई होत नसल्याने अनेक प्रवासी आश्चर्य व्यक्त करत आहेत.

डोंबिवली रेल्वे स्थानकात प्रवासी फलाट क्रमांक पाचवरून मुंबईला जाणारी अतिजलद लोकल पकडण्यासाठी सकाळच्या वेळेत उभे असतात. यावेळी अतिजलद लोकल १५ ते २० मिनिटे उशिरा धावण्याची उद्घोषणा झाली तर प्रवासी तात्काळ रेल्वे मार्गात उड्या करून लोखंडी रोधक ओलांडून फलाट क्रमांक तीन वर येणारी धीमी लोकल पकडण्यासाठी धावपळ करतात. फलाट क्रमांक तीनवरील प्रवासी जलद लोकल ठाकुर्ली रेल्वे स्थानकातून दिसत असताना रेल्वे मार्गात उड्या मारून डोंबिवली रेल्वे स्थानकात फलाट क्रमांक पाचवर येणारी लोकल पकडण्याची प्रयत्न करतात.

तसेच, अनेक प्रवासी जिने चढायला लागू नये म्हणून रेल्वे मार्ग ओलांडून पूर्व, पश्चिम भागात जातात. रेल्वे मार्गातील लोखंडी रोधक उंच असल्याने अनेक वेळा प्रवाशांना त्या रोधकावरून उड्या मारून पलीकडे जाता येत नाही. म्हणून प्रवाशांनी रोधकावरून उडी मारण्यासाठी लोखंडी रोधकाजवळ मोठे दगड, कॉंक्रिटच्या गोणी आणून ठेवल्या आहेत. या गोणी, दगडावर पाय ठेवला की लोखंडी रोधकावरून अलगद पलीकडे जाता येते. रेल्वे मार्ग ओलांडताना अनेक वेळा फलाट क्रमांक पाच, चारवरून मेल, एक्सप्रेस, मालगाड्या धावत असतात. ठाकुर्ली ते डोंबिवली, कोपर, दिवा रेल्वे स्थानकांच्या दरम्यान रेल्वे प्रवासी मृत्यू होण्याचे प्रमाण सर्वाधिक आहे.

# युवापिढीने मन:स्वास्थ्य टिकवण्यासाठी काय करावं?

"डॉक्टर, गेली तीन वर्षे मी आयटी क्षेत्रात काम करतोय. माझ्याबरोबर नोकरीला लागलेला मित्र जास्त चांगली नोकरी मिळाली म्हणून ही नोकरी सोडून गेला. मी मात्र इथेच राहिलो. आता काम करावेसेच वाटत नाही. पुढे काही भविष्यच नाही असे वाटते. कुठल्याही गोष्टीत रस राहिला नाही. रात्र रात्र झोप येत नाही. आपण पाहिलेली करिअरबद्दलची स्वप्ने कशी पूर्ण होणार असा विचार सतत मनात असतो. त्यामुळे माझे सिगरेट पिणे खूप वाढले आहे. सकाळी उठल्या उठल्या पहिली सिगरेट लागते", सुहास त्याची व्यथा मांडत होता.

"लग्नाला दोन वर्षे झाली. माझी नोकरी मार्केटिंग कंपनीत आहे. खूप मिटींग्स, प्रवास असतो. अनेक जण भेटतात. गेल्या सहा महिन्यांत आमचे एकमेकांशी पटेनासे झाले आहे. वेगळे राहतो. घटस्फोट घेणे हा एकाच पर्याय समोर आहे. ह्याचा मला प्रचंड मानसिक त्रास होतो. सारखे रडू येते. एकटे वाटते. कुठेतरी निघून जावे असे वाटते. भूक लागत नाही. पण कामाच्या निमित्ताने असलेल्या सर्व पार्ट्यांना मी जातेच जाते. पितेही नियमितपणे. माझे चुकते आहे. काय करू कळत नाही", सोनाली सांगता सांगता रडू लागली.

उत्तम शिक्षण घेऊन नोकरी करणाऱ्या युवकांमध्ये नोकरी, तिथली स्पर्धा, स्वतःच्या महत्वाकांक्षा, आपल्या आणि आपल्या जोडीदाराकडून असलेल्या अपेक्षा अशा विविध कारणांनी ताणतणाव मोठ्या प्रमाणावर आढळून येतो. त्यातून निराशा निर्माण होताना दिसते. त्या त्या क्षेत्रातील वातावरणामुळे आणि समाजमान्यतेमुळे सिगरेट, मद्यपान, अशा व्यसनांकडे वळणारे तरुण तरुणीही मोठ्या प्रमाणावर दिसतात.

'गेले वर्षभर नोकरी मिळत नाहीये. बारावीपर्यंत शिक्षण घेतले, पण मनासारखी नोकरी नसल्यामुळे घरातच असतो. मग घरचेही सारखे बोलतात. गेल्या दोन महिन्यांपासून घराबाहेर पडावेसेच वाटत नाही. आपल्या जगण्याला काही अर्थ नाही असे वाटत राहते. म्हणून शेवटी काल रात्री उंदीर मारण्याचे औषध खाल्ले. वाटले मरण आले तर बरे.'

'लग्नानंतर सासरी केवळ छळच सहन करते आहे. शेवटी कंटाळले. झोपेच्या गोळ्या खाऊन या सगळ्यातून सुटका झाली तर बरे असं वाटलं आणि आत्महत्त्येचा प्रयत्न केला. नसते वाचले तर बरे झाले असते.'

आपल्या देशात होणाऱ्या आत्महत्त्यांपैकी ४०% आत्महत्त्या ३० वर्षांपेक्षा कमी वय असलेल्या युवकांनी केलेल्या असतात. तरुणींमध्ये हे प्रमाण तरुणांपेक्षा जास्त असते. युवकांमध्ये मुख्यत्वेकरून उदासपणा, अतिचिंता, व्यसनाधीनता असे मानसिक विकार दिसतात. सर्वसाधारणपणे युवकांचे मानसिक स्वास्थ्य चांगले असते. तरीही अनुवांशिकता, मेंदूतील रसायनांमधील बदल अशा जैविक आणि अनेक मनोसामाजिक कारणांमुळे १५-२०% युवकांना मानसिक त्रासाला सामोरे जावे लागते.



समाजातल्या वाढत्या स्पर्धेला तोंड देताना मानसिक बळ (coping skills) कमी पडते. नातेसंबंधामध्ये दुरावा, मित्रपरिवाराशी सुसंवाद नसेल तर एकटेपणा येतो. समाजातील कठीण परिस्थिती उदा. गरीबी, बेकारी, स्त्री-पुरुष असमानता, स्त्रियांवरील अत्याचार, भ्रष्टाचार तरुणांना निराश करू शकते. लहानपणापासून प्रतिकूल परिस्थितीला सामोरे जावे लागले तर तरुणपणी मानसिक विकार होण्याची शक्यता बळावते. शहरामध्ये गर्दी, लोकसंख्या, नोकरी-व्यवसायातील स्पर्धा तसेच कामातील नीरसता, दैनंदिन जीवनातील संघर्ष अशांचा सामना करावा लागतो. ग्रामीण युवकांसमोरील आव्हाने वेगळ्या प्रकारची आहेत. अवघड बनत चाललेला शेती व्यवसाय, शिक्षणानंतर संधी उपलब्ध नसणे, सामाजिक विषमता, बदलते सांस्कृतिक वातावरण, शहराकडे स्थलांतर आणि आर्थिक चणचण या सगळ्यामुळे गावातला तरुण निराश होताना दिसतो.

युवकांमधील मानसिक समस्यांचे निराकरण करण्यासाठी त्यांचे लवकर निदान होणे आणि उपचार सुरु होणे आवश्यक आहे. त्यासाठी मानसिक विकारांबद्दल जागृती असणे तसेच विकाराशी जोडलेला कलंक नाहीसा होणे हेही गरजेचे आहे. परंतु मानसिक स्वास्थ्य म्हणजे केवळ मानसिक आजारांवर उपचार नव्हे तर मानसिक विकारांना प्रतिबंध आणि मानसिक स्थिती सुदृढ करण्याचा प्रयत्न करणे होय.

आपले मानसिक बळ वाढवण्यासाठी युवकांनी करण्यासारखे प्रयत्न केल्यास त्यात नक्की यश येऊ शकते. वास्तववादी महत्वाकांक्षा ठेवणे, त्या पूर्ण करण्यासाठी टप्प्याटप्प्याने ध्येय गाठणे, त्यासाठी कष्टांची तयारी असणे आवश्यक! कामातील तोचतोचपणा घालवण्यासाठी आज अनेक जण वर्षभराची सुट्टी घेऊन ग्रामीण भागात जाऊन सामाजिक आणि विकासाच्या कामात हातभार लावताना दिसतात. फोटोग्राफी, गाणे, वाद्यसंगीत, निसर्गाच्या सान्निध्यात भटकंती असे अनेक उपक्रम करून आज अनेक युवक आपल्या ताणतणावांचा सामना करतात.

शाळा- महविद्यालायीन शिक्षणापासून पुढील पिढीचे मानसिक स्वास्थ्य टिकवावे आणि वाढावे म्हणून प्रयत्न केले जाऊ शकतात. शिक्षकांची भूमिका यामध्ये महत्वाची ठरते. विद्यार्थ्यांसमोर योग्य आदर्श उभे करणे, आपल्या संस्कृती इतिहासाबद्दलची माहिती देऊन स्वाभिमानाची भावना मनात निर्माण करणे, शालेय उपक्रम-प्रकल्पांमधून मुलांमधील विविध गुणांना वाव देणे व त्यातून त्यांस स्वतःची ओळख पटवून देणे, विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देणे, खेळांच्या व कलांच्या माध्यमातून मनोरंजनाबरोबरच ताणतणावाशी सामना करण्याचे साधन मिळवून देणे अशा विविध पद्धतींनी शिक्षक तरुण पिढीचे मनोसामार्थ्य वाढवू शकतात.

कुटुंबातील सदस्य सुदृढ नातेसंबंधांमधून युवकांना मानसिक व भावनिक आधार देतात. आपल्या संकटकाळी आपण आपल्या कुटुंबाची मदत घेऊ शकतो असा विश्वास ज्या तरुणांमध्ये असतो त्यांना लवकर निराशा येत नाही. केवळ शैक्षणिक गुणवत्तेचे नाही तर इतर गुणांचेही तेवढेच कौतुक कुटुंबात असेल तर आत्मविश्वास वाढीस लागतो आणि जीवनातील आव्हानांना सामोरे जाण्याची शक्ती मिळते. वैवाहिक समस्या, आर्थिक समस्या, व्यावसायिक समस्या अशा कोणत्याही समस्येला सामोरे जाताना आपण एकटे नाही, आपले कुटुंबीय आपल्या पाठीशी आहेत ही भावना मनात सुरक्षितता निर्माण करते आणि अपयशाचा सामना करणे सहज शक्य होते.

आधीच्या पिढीमध्ये पुढच्या पिढीला गुरू म्हणजे मार्गदर्शक, सल्लागार असे कोणी मिळाले तर मोठा आधार मिळतो. निर्णय प्रक्रियेला मदत होते आणि मानसिक स्थैर्य प्राप्त होते. आजच्या मध्यमवयीन, वृद्ध अशा विविध वयोगटातील पिढीचे आजच्या तरुण पिढीच्या मानसिक आरोग्यामध्ये योगदान महत्त्वाचे! आज आपल्या देशातील एकूण लोकसंख्येच्या ३५% युवक आहेत. जगातील सर्वात मोठी युवाशक्ती आपल्या देशात आहे. या युवाशक्तीचे शारीरिक आणि मानसिक स्वास्थ्य ही आपली सगळ्यांची मिळून जबाबदारी आहे.

# विजेता अल्काराझ आणि उपविजेता जोकोविचला बक्षीस म्हणून किती रक्कम मिळाली?

स्पेनचा २१ वर्षीय खेळाडू कार्लोस अल्काराझने विम्बल्डन २०२४ मध्ये ऐतिहासिक विजय नोंदवला. त्याने अंतिम सामन्यात सर्बियन दिग्गज नोव्हाक जोकोविचचा पराभव करून सलग दुसऱ्यांदा हे विजेतेपद पटकावले आहे. या विजेतेपदासह कार्लोस अल्काराझवर पैशांचा पाऊस पडला. विम्बल्डन २०२४ फायनल जिंकल्यानंतर त्याला किती कोटी रुपये बक्षीस म्हणून मिळाले, ते जाणून घेऊया?



स्पेनच्या २१ वर्षीय कार्लोस अल्काराझने विम्बल्डन २०२४ मध्ये सलग दुसऱ्यांदा विजेतेपद पटकावले आहे. त्याने अंतिम सामन्यात अनुभवी नोव्हाक जोकोविचचा पराभव करून ही कामगिरी केली. त्याने जोकोविचचा सरळ सेटमध्ये ६-२, ६-२, ७-६ अशा फरकाने धूळ चारली. विम्बल्डन २०२४ पुरुष एकेरी विजेत्या कार्लोस अल्काराझला बक्षीस रक्कम म्हणून ३,४२७,३९६ पौंड (२८ कोटी ३५ लाख रुपये) मिळाले. तर उपविजेता नोव्हाक जोकोविचलाही बक्षीस म्हणून घसघशीत रक्कम मिळाली.त्याला १,४००,००० पौंड (१४ कोटी ७० लाख रुपये) मिळाले. गेल्या वर्षी विम्बल्डन २०२३ विजेत्या अल्काराझला २५ कोटी रुपयांची बक्षीस रक्कम देण्यात आली होती.

**विम्बल्डन २०२४ एकेरी विजेत्या खेळाडूंना मिळालेली बक्षीस रक्कम –**

विजेता: २८ कोटी ३५ लाख रुपये

उपविजेता: १४ कोटी ७० लाख रुपये

उपांत्य फेरी: ७ कोटी ७५ हजार रुपये

उपांत्यपूर्व फेरी: ३ कोटी ९३ लाख ७५ हजार रुपये

चौथी फेरी: २ कोटी ३७ लाख ३० हजार रुपये

तिसरी फेरी: १ कोटी ५० लाख १५ हजार रुपये

दुसरी फेरी : ९७ लाख ६५ हजार रुपये

पहिली फेरी: ६३ लाख रुपये

**अल्काराझ आणि जोकोविचची लढत कशी होती?**

विम्बल्डन २०२४ च्या अंतिम सामन्यात स्पेनच्या कार्लोस अल्काराझने पहिल्या दोन सेटमध्ये जोकोविचचा सहज पराभव केला. त्याने पहिले दोन सेट ६-२, ६-२ असे जिंकले, पण नंतर तिसरा सेट जिंकण्यासाठी त्याला खूप संघर्ष करावा लागला. तिसरा सेट टायब्रेकरपर्यंत गेला, ज्यामध्ये कार्लोसने कारकिर्दीतील चौथे ग्रँडस्लॅम जेतेपद पटकावले. कार्लोसने यूएस ओपन २०२२, विम्बल्डन २०२३, फ्रेंच ओपन २०२४ जिंकले आणि आता विम्बल्डन २०२४ जिंकले.

# गौतम गंभीर-किंग खानचा अंबानींच्या लग्नात 'ब्रोमान्स'



अनंत अंबानी आणि राधिका मर्चंट यांच्या लग्नाला जगभरातील सेलिब्रिटींनी हजेरी लावली होती. बॉलिवूडचा बादशाह अर्थात शाहरुख खान आणि टीम इंडियाचे नवनियुक्त मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर यांनीही या शानदार सोहळ्याला हजेरी लावली. या लग्नात कोलकाता नाईट रायडर्सचा सहमालक शाहरुख खान आणि गौतम गंभीर यांची भेट झाली. या दोघांच्या भेटीचा व्हीडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या या व्हिडिओमध्ये बॉलीवूड सुपरस्टार शाहरुख केकेआरचा माजी मेंटॉर गंभीरची गळाभेट घेताना दिसत होता. हे दोघेही गळाभेट घेतानाच एकमेकांशी बोलतही होते. दोन सेलिब्रिटींमधील प्रेम आणि आदर हा यातून दिसून येत होता. तर गंभीरसह त्याची पत्नी होती, तिनेही शाहरूखची भेट घेतली. एक खेळाडू म्हणून, गौतम गंभीरने केकेआरला २०१२ आणि २०१४ मध्ये आयपीएल विजेतेपद मिळवून दिले. यानंतर, तो २०२४ मध्ये केकेआरमध्ये मेंटॉर म्हणून परतला आणि त्याच्या मार्गदर्शनाखाली त्याने संघाला चॅम्पियन बनवले. पण आता गंभीर आणि केकेआरचा मार्ग पुन्हा वेगळा झाला आहे. टी-२० विश्वचषक स्पर्धेत भारताला विश्वविजेते बनवल्यानंतर राहुल द्रविड यांचा मुख्य प्रशिक्षकपदाचा कार्यकाळ संपला. आता गौतम गंभीर मुख्य प्रशिक्षक म्हणून श्रीलंका दौऱ्यापासून रूजू होणार आहे.

## दिनविशेष

**घटना**

६२२: हिजरी कॅलेंडर - इस्लामिक हिजरी कॅलेंडरची सुरुवात झाली.

१९९८: गुजरातमध्ये शाळेतील प्रवेशाच्या वेळी पाल्याच्या नावानंतर आईलाही नाव लावण्याच्या अधिकाराचा निर्णय.

१९९२: शंकरदयाळ शर्मा - यांची भारताचे ९ वे राष्ट्रपती म्हणून निवड.

१९६९: अपोलो-११ अंतराळयान यशस्वी प्रक्षेपण..

१९६५ : मॉंट ब्लॅक बोगदा ईटली व फ्रान्स देशांना जोडणाऱ्या मॉंट ब्लॅक बोगद्याचे उदघाटन झाले.

१९४५ : अमेरिका - पहिल्या अणुबॉम्बची चाचणी, त्यामुळे आण्विकशक्तीचे युग सुरु झाले..

१९३५ : अमेरिका - देशात जगातील पहिले पार्किंग मीटर बसवण्यात आले.

१६६१ : युरोप - स्वीडिश बँकेने तयार केलेल्या चलन नोटांचा वापर सुरु.

**जन्म**

१९८४ : कतरिना कैफ - हिंदी चित्रपट अभिनेत्री

१९७३ : शॉन पोलॉक - दक्षिण अफ्रिकेचे क्रिकेटपटू

१९६८ : धनराज पिल्ले- भारतीय हॉकी पटू पद्मश्री, ध्यानचंद खेलरत्न

१९६८: लैरी सेन्जर - विकिपीडियाचे सहसंस्थापक

१९४३: प्रल्हाद इरबाजी सोनकांबळे - लेखक आणि प्राध्यापक (निधन: ६ जानेवारी २०१०)

१९३९: श्रृंगी नागराज - भारतीय अभिनेते आणि निर्माते (निधन: १६ जुलै २०१३)

**निधन**

२०२२: वाकानोहना कांजी (दुसरा) - जपानी ५६वे योकोझुना सुमो पैलवान (जन्म: ३ एप्रिल १९५३)

२०२०: नीला सत्यनारायणन - महाराष्ट्रातील पहिल्या महिला राज्य निवडणूक आयुक्त (जन्म: ५ फेब्रुवारी १९४८)

२०१४: कार्ल अल्ब्रेक्ट - जर्मन व्यापारी, अल्दी सुपरमार्केट कंपनीचे सह- स्थापना (जन्म: २० फेब्रुवारी १९२०)

२०१३ : बरुन डी भारतीय इतिहासकार आणि लेखक (जन्म: ३० ऑक्टोबर १९३२)

२०१३ : श्रृंगी नागराज - भारतीय अभिनेते आणि निर्माते (जन्म: १६ जुलै १९३९)

१९९४ : जुलियन श्वाइंगर अमेरिकन भौतिकशास्त्रज्ञ - नोबेल पारितोषिक

१९९३ : उ. निसार हुसेन खान रामपूर साहसवान घराण्याचे ख्यालगायक

# ११२व्या मिनिटाला गोल अन् अर्जेंटिनाचा कोलंबियावर विजय

लिओनेल मेस्सीच्या अर्जेंटिनाने सलग दुसऱ्यांदा कोपा अमेरिकाचे विजेतेपद पटकावले आहे. कोलंबियाविरुद्धचा विजेतेपदाचा सामना निर्धारित वेळेत ०-० असा बरोबरीत होता. पहिल्या अतिरिक्त हाफमध्येही दोन्ही संघांना गोल करता आला नाही. पण ११२व्या मिनिटाला लुतारो मार्टिनेझने अर्जेंटिनासाठी गोल केला. या गोलनंतर ही आघाडी अर्जेंटिनाने शेवटपर्यंत कायम राहिली आणि मेस्सीचा संघ १-० असा विजय मिळवत चॅम्पियन ठरला. अर्जेंटिनाने १६व्यांदा ही स्पर्धा जिंकली आहे. २०२१ मध्ये, संघाने विजेतेपदाच्या सामन्यात ब्राझीलचा पराभव केला होता. तर मेस्सीच्या कारकिर्दीतील ही चौथी आंतरराष्ट्रीय ट्रॉफी आहे.




कोपा अमेरिकाच्या फायनलमध्येच अर्जेंटिनाच्या लिओनेल मेस्सीला दुखापत झाली. त्यामुळे मेस्सी संपूर्ण कोपा अमेरिका फायनल खेळू शकला नाही. सामन्याच्या उत्तरार्धात मेस्सीच्या पायाला दुखापत झाली. घोट्याच्या दुखापतीमुळे मेस्सीला ६६व्या मिनिटाला मैदान सोडावे लागले. त्याच्या उजव्या पायावर आईस पॅक होता. मैदानाबाहेर गेल्याने मेस्सी रडत होता, ज्याचा व्हीडिओ समोर आला आहे. आता त्याचा संघ विजेता ठरला आहे. जोवानी लो सेल्सोच्या पास वर मार्टिनेझने गोल केला.

आतापर्यंत कोपा अमेरिका स्पर्धेत एकाच संघाचे वर्चस्व पाहायला मिळाले आणि ते म्हणजे अर्जेंटिना. हे विजेतेपद सर्वाधिक वेळा जिंकण्याचा विक्रम अर्जेंटिनाने केला आहे. ही स्पर्धा १९१६ मध्ये पहिल्यांदा खेळली गेली, ज्याचे आयोजन अर्जेंटिनाने केले होते. उरुग्वे संघाने अंतिम फेरीत यजमान संघाचा पराभव करून पहिले विजेतेपद पटकावले. अर्जेंटिनाने १९२१ मध्ये पहिल्यांदा ही ट्रॉफी पटकावली होती आणि तेव्हापासून या संघाने एकूण १५ वेळा या ट्रॉफीवर आपले नाव कोरले आहे. लिओनेल मेस्सीच्या कारकिर्दीतील ही चौथी आंतरराष्ट्रीय ट्रॉफी आहे. २०२१ मध्ये, त्याने कोपा अमेरिकाचे जेतेपद पटकावत पहिली ट्रॉफी जिंकली. अर्जेंटिनाने २०२२ मध्ये युरो आणि कोपा अमेरिका विजेते यांच्यात होणारा आर्टेमियो फ्रँची चषकही जिंकला होता. त्याच वर्षी मेस्सीने पहिला फिफा विश्वचषक जिंकला.

## राशि भविष्य

**मेष** — ताबडतोब आराम पडावा यासाठी वैद्याकीय सल्ला घ्या. आज या राशीतील काही बेरोजगार लोकांना नोकरी मिळू शकते ज्यामुळे त्यांची आर्थिक स्थिती सुधारेल. घरातील संवेदनशील प्रश्न सोडविण्यासाठी तुम्हला आज तुमची बुद्धिमत्ता आणि प्रभाव दाखववावा लागेल.

**वृषभ** — तुम्ही सकारात्मक दृष्टिकोन आणि विश्वास यामुळे तुमच्या अवतीभवतीच्या लोकांवर प्रभाव पाडण्याची शक्यता आहे. आज तुमचे धन बऱ्याच गोष्टींवर खर्च होऊ शकते तुम्हाला आज चांगले बजेट प्लॅन करण्याची आवश्यकता आहे यामुळे तुमच्या बऱ्याच समस्या दूर होऊ शकतात.

**मिथुन** — तुमचा भावनाविवश स्वभाव तुम्हाला एखाद्या गंभीर आजारपण जडवू शकतो. दुस-यांवर प्रभाव पडावा म्हणून मर्यादेच्या बाहेर खर्च करू नका. आज घरात तुम्ही कुणालाही दुखवू नका आणि कुटुंबाच्या गरजा समजून घ्या. आजच्या दिवशी काळजी करू नका, आपले दु:ख बर्फाप्रमाणे वितळून जाईल.

**कर्क** — तुमच्या मनावर ग्रासलेला विषाद काढून टाका - त्यामुळे तुमच्या प्रगतीत अडसर निर्माण झाला आहे. प्रलंबित देणी आल्यामुळे आपली सांपत्तिक स्थिती सुधारेल. मुलांमुळे आजचा दिवस खूप कठीण होण्याची शक्यता आहे. त्यांच्याशी वात्सल्याने वागा आणि त्यांच्यावरील अनावश्यक ताण दूर करुन त्यांचा इंटरेस्ट कायम ठेवा.

**सिंह** — आपल्या अनुमान न लावता येणा-या स्वभावाचा परिणाम आपल्या वैवाहिक आयुष्याला हानीकारक ठरणार नाही याची दक्षता घ्या. शक्यतो हे टाळण्याचा प्रयत्न करा, अन्यथा नंतर तुम्हाला पश्चाताप करावा लागू शकतो. या राशीतील काही लोकांना आज जमिनीने जोडलेल्या काही मुद्यांना घेऊन धन खर्च करावे लागू शकते.

**कन्या** — दिवस भरत आलेल्या गर्भवती महिलांसाठी विशेष काळजीचा दिवस. लोकांना नेमके काय हवेय हे समजावून घ्या आणि तुमच्याकडून काय हवे आहे तेही समजून घ्या - परंतु आज खर्च करताना उधळपट्टी करू नका. नातेवाईक/मित्रमंडळी अचानक संध्याकाळी तुमच्या घरी अवतरतील आणि धमाल उडवून देतील.

**तूळ** — उच्च कॅलरी असणारा आहार टाळा, आपल्या व्यायामाबद्दल आपुलकी, प्रामाणिकपणा असू द्या. आपल्या पालकांनी केलेल्या मदतीमुळे आर्थिक अडचणींवर मात करणे शक्य होईल. शांतता राहावी आणि कौटुंबिक वातावरण दूषित होऊ नये यासाठी तुम्ही रागावर मात करणे अत्यंत गरजेचे आहे.


**वृश्चिक** — आपल्या आरोग्याकडे दुर्लक्ष करू नका, विशेषकरून मद्यापान टाळा. आई -वडिलांच्या आरोग्यावर तुम्हाला आज अधिक धन खर्च करावे लागू शकते. यामुळे तुमची आर्थिक स्थिती बिघडेल परंतु, नात्यामध्ये मजबुती येईल. तुमच्या ज्ञानलालसेपोटी नवीन मित्र जोडाल.

**धनु** — अडचणींचा बाऊ करण्याच्या सवयीमुळे तुमचे नीतीधैर्य खचेल. दिवसाची सुरवात जरी चांगली असली तरी, संद्याकाळच्या वेळी कुठल्या कारणास्तव तुमचे धन खर्च होऊ शकते ज्यामुळे तुम्ही चिंतीत व्हाल. नातेवाईक/मित्रमंडळी अचानक संध्याकाळी तुमच्या घरी अवतरतील आणि धमाल उडवून देतील.

**मकर** — तुम्हाला एखाद्या धार्मिक स्थळी जाण्याची इच्छा होईल. त्यासाठी तुम्ही धार्मिक स्थळी जाऊन ज्ञानी-योगी-दैवी व्यक्तीला भेटून त्यांच्यादजवळून ज्ञान मिळवाल, आशीर्वाद मिळवाल. आपल्या रागावर नियंत्रण ठेवा आणि ऑफिस मध्ये सर्वांसोबत चांगल्या प्रकारे व्यवहार करा जर तुम्ही असे केले नाही तर, तुमची नोकरी जाऊ शकते आणि तुमची आर्थिक स्थिती खराब होऊ शकते.

**कुंभ** — आयुष्याबद्दल उदार दृष्टीकोन तयार करा. आपल्या परिस्थितीबद्दल जगण्याबद्दल तक्रारी करुन उदास होण्यात काहीही अर्थ नाही. अशा प्रकारचे लाचार निराश विचार, जगण्यातील मजा आणि आयुष्याकडूनच्या आशा अपेक्षा उद्ध्वस्त करुन टाकतात.

**मीन** — आशावादी रहा आणि चांगल्या उजळ बाजूकडे लक्ष द्या. आपल्या आत्मविश्वासाला अपेक्षांची जोड मिळाल्यामुळे आपल्या आशा आकांक्षा आणि स्वप्ने प्रत्यक्षात येतील. आज धन तुमच्या हातात टिकणार नाही, तुम्हाला धन संचय करण्यात आज खूप समस्यांचा सामना करावा लागू शकतो.



# क्रांती स्तंभाच्या दुरुस्तीसाठी सातारकरांवर नव क्रांती करण्याची वेळ

सातारा : छत्रपतींची राजधानी असलेल्या सातारा शहरात देशाच्या स्वातंत्र्यासाठी अनेक क्रांतिकारकांनी लढा दिला. त्यांची आठवण जतन करण्यासाठी सातारा बस स्थानक शेजारी क्रांतीस्तंभ उभारण्यात आलेला आहे. सध्या क्रांती स्तंभाची अवस्था अत्यंत बिकट झाली आहे . या क्रांती स्तंभाच्या देखभाल दुरुस्तीसाठी सामाजिक कार्यकर्त्यांवर नव क्रांती करण्याची वेळ राज्यकर्त्यांनी आणलेली आहे .

याबाबत माहिती अशी की, भारतीय स्वतंत्र संग्राम १९४२ चलेजाव चळवळीची आठवण जतन करण्यासाठी सातारच्या प्रति सरकार स्मारक क्रांतीस्तंभ उभारण्यात आले. या क्रांतीस्तंभचे पायाभरणी सोमवार दिनांक ८ ऑगस्ट २०१६ रोजी तात्कालीन सातारा जिल्हाधिकारी अश्विन मुदगल यांच्या हस्ते करण्यात आले. ही संकल्पना सातारचे प्रति सरकार स्मारक समितीने केली. त्याकाळी सुमारे २५ लाख खर्च करून या क्रांतीस्त्यांची उभारणी करण्यात आली. त्यावर क्रांतीकारक क्रांतिसिंह नाना पाटील, रावसाहेब कळके, शेख काका, जोशी काका, अच्युतराव पटवर्धन, बापूराव जगताप, कमलाबाई शेडगे, लक्ष्मीबाई नायकवडी, अरुणा अश्रफ अली, महादेव सिरगे, बापू कचरे, बापूजी साळुंखे, बाबूजी पाटणकर, गणपतराव पाटील, लाला इंगळे व जंगम गुरुजी अशा अनेक मान्यवरांची नावे कोरली गेलेली आहेत. आज याच क्रांती स्तंभाला बेवारस झाडे झुडपांनी आलिंगन दिलेले आहे.

> या क्रांतीस्तंभ शेजारी असलेल्या संग्रहालयात ऐतिहासिक शिवकालीन वागणके दिनांक 19 जुलै रोजी आणण्यात येणार आहे यावेळी अनेक रथी महारथी उपस्थित राहणारे तत्पूर्वी या क्रांती मला न्याय मिळेल का? याची सातारकर प्रतीक्षा करत आहेत.

छत्रपती शिवाजी महाराज पुरातन वस्तू संग्रहालयाच्या शेजारी या क्रांतीस्तंभाकडे जाण्यासाठी असलेल्या दरवाजाला फक्त कुलूप असून बाकीचा सांगाडा उघडा पडलेला आहे. हाच उघडा सांगाडा राज्यकर्त्यांच्या कार्यपद्धतीवर प्रकाश टाकत आहे. सदरच्या क्रांतीस्तंभाची देखभाल व दुरुस्ती राज्यकर्त्यांकडून होत नसेल तर या ठिकाणी सामाजिक संस्थेकडे ही जागा सुपूर्द करून त्यांच्यामार्फत या जागेची निगा राखावी. अशी मागणी रिपब्लिकन सेनेचे जिल्हाध्यक्ष विशाल भोसले, शहर सुधार समितीचे असलम तडसर कर शाहीर शहाबुद्दीन शेख शेतकरी संघटना व सामाजिक कार्यकर्ते दादासाहेब राजेशिर्के, वंचित च शहराध्यक्ष मिलिंद कांबळे व उपाध्यक्ष अमोल गंगावणे व सातारकर नागरिकांनी केली आहे.

# भल्यामोठ्या अजगरामुळे दहा गावांत अंधार...



वर्धा : पावसाळ्यात विद्युत प्रवाह विविध कारणांनी बंद पडण्याचा प्रकार नवा नाही. आधीच ग्रामीण भागात मर्यादित वीज पुरवठा व त्यातही पाऊस, वादळवारा, तारांवर झाडे पडणे असे प्रकार लाईन गेली रे अशी आरोळी ठोकण्यास कारणीभूत ठरत असतात. मात्र एक जगावेगळा प्रकार घडला. चक्क एका भल्यामोठया अजगरमुळे दहा गावांत अंधार पसरला. समुद्रपूर येथे एका भागात लग्नासाठी लॉन व मंगल कार्यालय आहे. त्यासमोर विद्युत पुरवठ्याचे नियमन करणारे रोहित्र आहे. जाम ते समुद्रपूर मार्गावरील या विद्युत कंपनीच्या रोहित्रा जवळ घटनेच्या दिवशी एक अनाहुत पाहुणा आला आणि उजेडाचा खेळखंडोबा झाला. रात्री साडे आठ वाजता तिथेच काम करणाऱ्या मजुरांना एका धक्कादायी दृष्य दिसले. रोहित्राच्या खांबावर एक लांबलचक अजगर वरच्या दिशेने चढत असल्याचे दिसून आले. वरच्या भागात असलेल्या तारांना या अजगराचा स्पर्श झाला असता तर मोठी दुर्घटना घडली असती. यावेळी उपस्थित गावातील सामाजिक कार्यकर्ते पंकज पर्बत यांनी हा धोका ओळखला. त्यांनी लगेच सर्पमित्र प्रफुल्ल कुडे व हर्षल उमरे यांना फोनद्वारे माहिती देत बोलावून घेतले. कुडे व उमरे हे खांबा जवळ पोहचताच त्यांनी अजगर जवळपास विद्युत तारांजवळ पोहचल्याचे दिसून आले.

# १० वी १२ वी परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा उत्साहात संपन्न..

ठाणे ( प्रतिनिधी नम्रता सुर्यवंशी -: दरवर्षीप्रमाणे यंदाही आमदार प्रताप सरनाईक यांच्या मार्गदर्शनाखाली युवासेना कार्याध्यक्ष पूर्वेश सरनाईक यांच्या नेतृत्वात १० वी आणि १२ वी परीक्षेत उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी “गुणगौरव सोहळा आणि मार्गदर्शन शिबिर” या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. सदर कार्यक्रम रविवारी डॉ. काशिनाथ घाणेकर नाट्यगृहात संपन्न झाला.



उपस्थित विद्यार्थ्यांना प्रख्यात माईंड रीडर श्री. भूपेश दवे यांनी व्यक्तिमत्व विकासासाठी मार्गदर्शन केले व विद्यार्थ्यांचे मनोबल वाढवले. यावेळी विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते भेटवस्तू, प्रशस्तीपत्र, ट्रॉफी देऊन सन्मानित करण्यात आले.

यावेळी प्रताप सरनाईक यांनी विदयार्थ्यांना मार्गदर्शन केले व आजच्या स्पर्धेच्या युगात टिकून राहण्यासाठी विद्यार्थ्यांना मोठी कसरत करावी लागत आहे. वाढत्या स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांना मानसिक तणावाला सामोरे जावे लागते. विद्यार्थ्यांनी अपेक्षांच्या ओझ्याखाली न अडकता नेहमी आपल्यातले बेस्ट देण्याचा प्रयत्न करावा असा कानमंत्र आमदार प्रताप सरनाईक यांनी दिला.

सर्वसामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांना करिअर संदर्भात मार्गदर्शन मिळावे. त्यांचा आत्मविश्वास वाढावा तसेच त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी गेली अनेक वर्षे गुणगौरव सोहळा आणि मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात येते असे कार्याध्यक्ष पूर्वेश सरनाईक यांनी यावेळी सांगितले.

लकी ड्रॉच्या माध्यमातून शिक्षणोपयोगी आकर्षक बक्षिसे देण्यात आली. कार्यक्रम संपल्यावर मुलांच्या चेहऱ्यावर एक वेगळाच आनंद व आत्मविश्वास पाहण्यास मिळाला.


# Waterlogging and traffic snarls reported as Delhi receives spells of intense rain

Delhi received intense rain on Monday morning, resulting in waterlogging and traffic snarls in parts of the capital. As of 11.30 am, the India Meteorological Department's Safdarjung base station had logged 2.7 mm of rain, whereas the Palam, Ridge, Delhi University and Pusa stations had recorded 31.8 mm, 37.2 mm, 37.5 mm and 35 mm of rain, respectively.

The Lodhi Road and Ayanagar weather stations recorded light rain of 2 mm and 1.2 mm, respectively, according to the IMD.

The IMD has issued a yellow alert for Monday and predicted a generally cloudy sky with light to moderate rain accompanied by thunderstorms.

The IMD located the monsoon trough to be at mean sea level passing through Jaisalmer, Kota, Guna, Damoh, Pendra Road, Sambalpur, Puri and thence southeastwards to the low-pressure area over Northwest adjoining West-central Bay of Bengal extending up to 1.5 km above mean sea level. The monsoon is likely to be active in Peninsular and adjoining central India during the next four-five days, according to the IMD bulletin.



delhi waterlogging Several parts of the city faced waterlogging issues after rainfall. (Express photo by Praveen Khanna)

In an X post, the traffic police advised the public to avoid New Rohtak Road and Anand Parbat in view of waterlogging. Waterlogging was reported also from Fateh Singh Margh but it was later cleared.

The maximum temperature recorded at the Safdarjung base station on Sunday was 37.1 degrees Celsius and the minimum temperature on Monday was 29 degrees Celsius–both two notches above normal. The relative humidity was below normal as of 8.30 am. The minimum humidity, at 59 per cent, was 5 per cent below normal and the maximum humidity, at 75 per cent, was 3 per cent below normal.

# Outlet market along NH-7 changing face of rural Bathinda



Bathinda, Bhucho villageThe concept of 'outlet market' was developed by Bhai Gurjinder Singh Sidhu (13th descendent of spiritual guru Bhai Bhagtu). As he hails from Bhucho village of Bathinda district, he started the work on his family land of around 5 acres in Bhucho itself. (Photo: nh7factoryoutlets.com)

It used to be a rural belt with farmland on both sides of the road as one travelled towards Bathinda – the fifth largest city of Punjab located in the Malwa region. The district with a large countryside – about 230 km from Chandigarh – seems to be gradually wiping away its tag of old and backward area of Punjab.

The gradual change started appearing on the scene from 2012 onwards when a couple of eating joints emerged on the outskirts of Bathinda, apart from improvement in the quality of roads. Now, Bhucho village is changing the face and image of Bathinda where a full-fledged outlet market – with more than 250 stores – has come up in the area along NH-7.

Earlier people of this villaage had to rely only on Bhucho Mandi, a typical rural area of Bathinda located about 15 km from the city where there is one single mandi (market) that caters to the people of the area. “A full-fledged outlet market in that area along NH-7 with over 250 stores is something which we can hardly see even in the city area,” said Dr Vitul Kumar Gupta, a senior physician, of Bathinda while talking to The Indian Express.

# कळमपाडा शाळेतील विद्यार्थ्यांना स्टडी टेबलचे वाटप !



वासिंद (प्रतिनिधी)- येथील कळमपाडा जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना रोटरी क्लब ऑफ अंबरनाथ तर्फे स्टडी टेबलचे वाटप करण्यात आले.

येथे संपूर्ण आदिवासी वस्ती आहे तर समाज सहभागातून व ग्रामस्थांच्या सहकार्यातून हि शाळा अतिशय सुंदर केली असून शाळेतील विद्यार्थी दरवर्षी शिष्यवृत्ती परीक्षा, जवाहर नवोदय प्रवेश परीक्षा व इतर स्पर्धा परीक्षा यात सातत्याने यश मिळवत आहेत. तसेच येथील विद्यार्थांची शैक्षणिक गरज लक्षात घेता रोटरी क्लब ऑफ अंबरनाथ घ्या वतीने बहुपयोगी अशा स्टडी टेबलचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रम प्रसंगी रोटरी क्लबचे अध्यक्ष संदेश नामदे शाळेचे मुख्याध्यापक प्रकाश झुगरे, सामाजिक कार्यकर्ते सतिश जाधव व रोटरी क्लबचे पदाधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचलन शाळेचे सहशिक्षक सुनिल परटोले यांनी तर आभार मुख्याध्यापक प्रकाश झुगरे यांनी मानले.

# 19 ऑगस्ट, 2024 रोजी परिमंडळ लोकशाही दिनाचे आयोजन

## 5 ऑगस्ट, 2024 पूर्वी निवेदन सादर करण्याचे आवाहन

ठाणे - नागरिकांच्या वैयक्तिक तक्रारींचा निपटारा तातडीने होण्यासाठी तालुकास्तरिय लोकशाही दिनाच्या धर्तीवर, ठाणे महानगरपालिकेच्यावतीने दर महिन्याच्या तिस-या सोमवारी परिमंडळ स्तरावरही लोकशाही दिनाचे आयोजन केले आहे. त्यानुसार, 1) 19 ऑगस्ट, 2024 रोजी परिमंडळ लोकशाही दिन होणार आहे. या लोकशाही दिनासाठी नागरिकांनी १५ दिवस आधी म्हणजे 5 ऑगस्ट पूर्वी आपली निवेदने सादर करण्याचे आवाहन ठाणे महानगरपालिकेच्यावतीने करण्यात आले आहे.

नागरिकांनी आपली निवेदने पुढील ठिकाणी सादर करावीत.


परिमंडळ १ - (कळवा, मुंब्रा, दिवा प्रभाग समिती अंतर्गत) उपायुक्त कार्यालय, कळवा प्रभाग समिती कार्यालय, कळवा

परिमंडळ २ - (नौपाडा, वागळे प्रभाग समिती अंतर्गत, उपायुक्त कार्यालय, नौपाडा प्रभाग समिती कार्यालय, ठाणे (प.)

परिमंडळ ३ - (उथळसर, वर्तकनगर, लोकमान्य. सावरकरनगर, माजिवडा मानपाडा प्रभाग समिती अंतर्गत) उपायुक्त कार्यालय, माजिवडा मानपाडा प्रभाग समिती कार्यालय, ठाणे (प.)

नागरिकांनी प्रथमतः परिमंडळ लोकशाही दिनात अर्ज दाखल करावेत. परिमंडळ लोकशाही दिनात दाखल केलेल्या तक्रारींवर कोणतीही कार्यवाही झाली नसल्यास नागरिक महापालिका लोकशाही दिनामध्ये नियमानुसार १५ दिवस आधी आपली निवेदने सादर करू शकतील. नागरिकांनी परिमंडळ लोकशाही दिनासाठी आपली निवेदने संबंधित परिमंडळ कार्यालयात सादर करावीत.

# डोणवत धरणात २६ वर्षीय युवकाचा पाण्यात बुडून मृत्यू



वावोशी/जतिन मोरे :- खालापूर तालुक्यात छत्तिशी विभागातील डोणवत धरणात एका २६ वर्षीय युवकाचा पाण्यात बुडून मृत्यू झाल्याची घटना दिनांक १४ जुलै रोजी सायंकाळी ६ वाजण्याच्या सुमारास घडली. ३ दिवसांपासून सतत पडत असलेल्या अतिवृष्टीने डोणवत धरण तुडुंब भरले असून या ठिकाणी हा व्यक्ती पोहण्यासाठी आला होता. परंतू त्याला पाण्याचा अंदाज न आल्याने त्याचा पाण्यात बुडून मृत्यू झाला आहे. सदरची घटना समजताच वावोशी पोलीस स्टेशनचे पोलीस हवालदार निलेश सोनवणे, गिरीश नगरकर, विकास शिंदे, अपघात ग्रस्तांची टीम, स्थानिक ग्रामस्थ यांच्या मदतीने सदरील मृतदेह पाण्याच्या बाहेर काढण्यात आले आहे. यावेळी वावोशीचे मंडळ अधिकारी सचिन वाघ, डोणवतच्या पोलीस पाटील ऋषाली मोरे, तलाठी अंजना मावळंकर यांनी या ठिकाणी उपस्थित राहून मृत व्यक्तीचा पंचनामा केला असून हा मृतदेह खालापूर येथील उपजिल्हा रुग्णालयात शवविच्छेदन करण्यासाठी पाठवला आहे. सदरील मृत व्यक्तीचे नाव उमेश चव्हाण असे असून तो मूळचा उत्तरप्रदेश येथील राहणारा आहे. तो कामानिमित्त पूर्वीची उत्तम स्टील व आताच्या ‘एम एन एस प्रा. लि. कंपनीत कंत्राटी स्वरूपात नोकरीला होता. तसेच या व्यक्तीचे दोन महिन्यापूर्वीच लग्न झाले असल्याचे समजत आहे.


# After weeks of languishing at a 4-year low, lake levels in Mumbai surpass 2023 levels

After reeling under a four-year low over the past month, the stock in the seven lakes supplying water to Mumbai finally surpassed last year's levels, with the lake levels soaring to 35.11 per cent – 5.08 lakh million litres – on Monday morning. Making it the highest one-day jump recorded in the season so far, the lake levels have witnessed a spike of nearly 6 per cent since Sunday, when the stock remained at 29.72 per cent.

While the levels rose to 35 per cent on Monday, last year, on the same day, the lake levels stood at 31.16 per cent of the total capacity. While in 2022, the water stock touched nearly 75 per cent.

However, even with the lake levels replenishing, civic officials have maintained that the 10 per cent water supply cut, which the city is currently experiencing, will stay.

Speaking to The Indian Express, an official from the civic hydraulic department said, “While the lake levels touched 35 per cent today (Monday),



in 2022, the water stock was over 70 per cent during the same time. Like last year, there is a water crisis and, therefore, the water cut will remain in place for now. We are monitoring the lakes and once the stock rises to a satisfactory level, we will take a call over the cut by the end of this month.”

The increasing water level in the lakes came in the wake of heavy showers battering the city for the past one week with the city surpassing its monthly average quota for July rain within two weeks on Sunday morning. While the metropolis receives an average of 855.7 mm of rain in the month of July, Mumbai has recorded 866 mm of rain so far.

Festive offer

The slow and steady rise in the lake levels has brought relief for the city where the water stock in the seven lakes plummeted to 5 per cent early in June. Owing to the rain deficit in June, the stock continued to languish at 5 per cent throughout the month, with the lake levels replenishing only after July.

Despite the spike, officials from Brihanmumbai Municipal Corporation (BMC) maintained that the 10 per cent water cut, which had been imposed in May, will remain in place until the lake levels reach a satisfactory level.

In a bid to maintain the minimum stock in the dams, the civic body – since early June – had been supplying water to the metropolis by drawing from the state reserve stock of Upper Vaitarna and Bhatsa lakes until July 1.

# ग्राहक न्यायालयाचा झोमॅटोला दणका

**१३३ रुपयांच्या मोमोंची डिलिव्हरी न दिल्याने ६० हजारांची भरपाई देण्याचे आदेश**




● कर्नाटक, (प्रतिनिधी):

सध्याच्या काळात ऑनलाईन जेवण ऑर्डर करण्याचं प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढलं आहे. ऑनलाईन जेवण ऑर्डर केल्यानंतर कधी-कधी ग्राहकांना मनस्तापाला सामोरं जावं लागल्याचेही अनेक उदाहरणं समोर आले आहेत. आता असाच एक प्रकार कर्नाटकातील धारवाड येथे घडला आहे. झोमॅटोवर मोमोज ऑर्डर करूनही डिलिव्हरी न मिळाल्याने एका महिलेला मनस्तापाला सामोरं जावं लागलं. मात्र, यानंतर एका वर्षांनी कर्नाटकच्या ग्राहक न्यायालयाने झोमॅटोला संबंधित महिलेला ६० हजार रुपयांची नुकसान भरपाई देण्याचे आदेश दिले आहेत.

एका महिलेने ३१ ऑगस्ट २०२३ रोजी झोमॅटोवर मोमोज ऑर्डर केले होते. त्यासाठी १३३ रुपयांचे ऑनलाईन पेमेंटही केले होते. ऑर्डर केल्यानंतर १५ ते २० मिनिटांमध्ये ऑर्डर मिळणं अपेक्षित होतं. मात्र, त्यानंतर ऑर्डर डिलिव्हरी झाल्याचा संदेश त्यांना आला. पण त्यांना ऑर्डर मिळाली नव्हती. त्यानंतर त्यांनी सांगितलं की ऑर्डर मिळाली नाही किंवा कोणताही डिलिव्हरी एजंट त्यांच्या घरी आला नाही. त्यानंतर त्या महिलेने रेस्टॉरंटकडे विचारणा केली असता डिलिव्हरी एजंटने त्यांच्याकडून ऑर्डर घेतल्याची माहिती त्यांना सांगण्यात आली.

यानंतर त्यांनी या प्रकाराची तक्रार झोमॅटोकडे ईमेलद्वारे केली. मात्र, त्यांना कोणताही प्रतिसाद दिला नाही. तसेच या संदर्भातील उत्तर मिळण्यासंदर्भात ७२ तास प्रतीक्षा करण्यास सांगण्यात आले. यानंतर या महिलेने १३ सप्टेंबर २०२३ रोजी ग्राहक तक्रार निवारण आयोगाकडे तक्रार दाखल केली. यानंतर झोमॅटोकडून वकील ग्राहक न्यायालयात हजर झाले आणि महिलेने केलेले आरोप खोटे असल्याचा दावा केला. पण याबाबतचे पुरावे महिलेने न्यायालयात सादर केले. त्यानंतर न्यायालयाने महत्वाचे निरीक्षण नोंदवत झोमॅटोने तक्रारदाराच्या तक्रारीची दखल घेण्यासाठी ७२ तासांचा कालावधी घेतला असं सिद्ध झाल्याचं म्हटलं.

तसेच त्यानंतरही कोणतेही उत्तर झोमॅटोकडून देण्यात आलं नाही. त्यामुळे ग्राहक न्यायालयाने म्हटलं की, यावरून असे दिसते आहे की झोमॅटोकडून चूक झाली आहे. त्यामुळे महिलेला अनेक समस्या आणि मानसिक त्रास सहन करावा लागला. पैसे देऊनही तक्रारदाराला संबंधित खाद्य पदार्थ पोहोचवला नाही. या प्रकरणातील हे तथ्य लक्षात घेत ग्राहक न्यायालयाने तक्रारदार महिलेच्या बाजूने निर्णय दिला. तसेच महिलेला नुकसान भरपाई म्हणून ६० हजार रुपये देण्याचा आदेश झोमॅटोला दिला.

# गडकरींच्या शंभर वर्ष गॅरंटीला कोकणातील अठरा वर्षे रखडलेला मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग खड्ड्यात जायला कारणीभूत गडकरी, कोकणातील खासदार की कोकणातील आमदार कोकणवाशीयांचा गडकरींना सवाल



● मुंबई (प्रतिनिधी) :

देशात होणाऱ्या नॅशनल हायवेला पुढील किमान 100 वर्ष कांही होणार नाही,एवढ्या गुणवत्तचे काम केले जात आहे असा दावा देशाचे रस्ते विकास व. राष्ट्रीय महामार्ग खात्याचे मंत्री नितीन गडकरी हे सातत्याने करत असतात.मात्र नितीन गडकरी यांच्या याच 100 वर्ष गॅरंटीच्या धोरणाला कोकणात जाणाऱ्या मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 66 हरताळ फासला आहे.100 वर्ष नाही तर अठरा वर्ष या रस्त्याचे काम चालू असून देखील हा रस्ता अद्यापि पूर्ण अवस्थेत जात तर नाही परंतु पूर्ण होण्याअगोदरच रस्त्याची दुरावस्था रायगड रत्नागिरी व सिंधुदुर्ग या जिल्ह्यात पाहण्यास मिळत आहे त्यामुळे मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाच्या दुरावस्थेला जबाबदार कोण गडकरी कोकणातली खासदार क कोकणातले आमदार असा सवाल कोकणवासी यांना पडला आहे.

मुंबई व राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 66 चे काम मागील सतरा वर्षापासून रायगड रत्नागिरी व सिंधुदुर्ग या तिन्ही जिल्ह्यात चालू आहे मात्र सतरा वर्षात किती वेळा रस्ता बांधण्यात आला व किती वेळा त्याची डागडूजी झाली याबाबत मात्र राज्य सरकार ना केंद्र सरकार श्वेतपत्रिका काढायला तयार या सर्व रस्त्यावर झालेला खर्च किती व ठेकेदाराला किती पैसे अदा केले खड्डे भरण्यावरती किती पैसे दिले याचा हिशोब 18 व्या वर्षी तरी कोकणवासी यांना मिळणार का या महामार्गावर सतरा वर्षात ज्या कोकण वाशी यांचे नाहक अपघातात बळी गेले काही जण कायमचे जायबंदी झाली त्यांचे काय याबाबत ना केंद्रीय मंत्री ना कोकणातील खासदार ना कोकणातील आमदार ना राज्य सरकारला ना केंद्र सरकारला जाब विचारत त्यामुळे कोकण वाशी यांनी दाद कोणी कोणाकडे मागायची असा घन प्रश्न कोकण वाशी यांना पडला आहे.

मुंबईतून कोकणात जाणाऱ्या रायगड रत्नागिरी व सिंधुदुर्ग या जिल्ह्यातून हा जो रस्ता जातो त्या रस्त्याला अनेक ठिकाणी मोठ्या मोठ्या भेगा पडल्या आहेत,तडे गेले आहेत.अनेक ठिकाणी रस्ता खाली वर झाला आहे,अनेक ठिकाणी खचला आहे, तर अनेक उड्डाण पुलावर सिमेंट कॉंक्रीटच्या रस्त्याला एवढ्या मोठ्या भेगा पडल्या आहेत की त्यात जर दुचाकी वाहनांचे टायर गेले तर ते बाहेर येणे अशक्य आहे,परिणामी गेल्या काळात अनेक अपघात झाले, आजही होत आहेत,परिणामी अनेकांना आपला जीव गमवावा लागला अशी परिस्थिती असताना कोकणातील लोकप्रतिनिधी मात्र मूग गिळून गप्प आहेत.

मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 66 च्या दुरावस्थेत बाबत आज ऐरणीवर आला आहे.मात्र या रस्त्याचे काम बोगस आणि निकृष्ट होण्यास आणि परिणामी ज्यांचा जीव गेला त्याला जबाबदार कोण ? या भागातील नेत्यांची,लोकप्रतिनिधींची टक्केवारी की भागीदारी असा प्रश्न आता निर्माण केला जातो आहे.केंद्रीय मंत्री नितीन गडकरी जर १०० वर्ष रस्त्याच्या हमीचा दावा करत असताना जर स्थानिक पातळीवर त्याचे तीन तेरा वाजवले जात असतील तर नक्कीच काम निकृष्ट नाही तर बोगस झाले आहे,कोट्यवधी रुपये केवळ अठरा वर्ष या रस्त्याच्या प्रत्येक जिल्ह्यात नूतनीकरणावर व खड्ड्यावर खर्च झाले हे लुटण्यासाठी झाले आहे हे जगजाहीर आहे.

कोकणात जाणारा मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 66 चे काम बोगस झाले असेल तर ते कोणाच्या आशीर्वादाने झाले हा मूळ प्रश्न आहे. मागील 18 वर्षात लोकसभेच्या तीन विधानसभेच्या तीन निवडणुका झाल्या याच महामार्गावरून केंद्रा सहित राज्यातील मंत्री यांनी प्रवास केला की नाही असा सवाल देखील आता कोकण कर जनता नितीन गडकरी यांना विचारीत आहे तब्बल 17 वर्ष कोकणातील लोकप्रतिनिधी व केंद्रातील मंत्र्यांनी या रस्त्यावरून प्रवास करून कोकणातील रस्त्याच्या दुरावस्थेबाबत त्यांना जाग येत नसेल तर हे कोकणचे दुर्दैव की कोकणातल्या भोळ्या भाबड्या साखर मानेंच्या जखमेवर मीठ चोळण्याचा हा केंद्रातील सत्ताधारी पक्षांचा प्रयत्न तर नाही ना

मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 66 च्या मागील सतरा वर्षात प्रत्येक जिल्ह्यात नूतनीकरण व डागडुजी केली ,मात्र करोडो रुपये खर्चून कांही महिन्याच्या आतच हे काम बोगस असल्याचे प्रत्येक जिल्ह्यात रस्त्यांच्या कामावरून हे सिद्ध होत असेल तर ज्याने काम केले त्यावर देखील कारवाई आणि नुकसानभरपाईची गरज आहे,फक्त तात्पुरती डागडुजी अपेक्षित नाही तर जे काम करताना अंदाजपत्रक सादर केले होते त्यानुसार काम झाले आहे का याची चौकशी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी व त्यांचे राष्ट्रीय महामार्ग खाते यांच्याकडून देखील होणे अपेक्षित आहे.तरच या भ्रष्टाचारी प्रवृत्तीला चाप बसणार आहे.

केंद्रीय राष्ट्रीय महामार्ग व दळणवळण मंत्री नितीन गडकरी मी गुत्तेदारांचा चहा पित नाहीत असा उघड दावा करतात, आणि त्यात तथ्य देखील गडकरी यांचा स्वभाव आणि राजकारण करण्याची पद्धत पाहता आहे हे सत्य देखील आहे.मात्र जेथे काम झाले आहे तेथील नेत्यांनी काय काय गाईचे दूध घेतले की दारू प्याले आणि काय काय खालले आहे हे वारंवार समोर आले आहे. मुंबई व राष्ट्रीय महामार्गाचे काम करणाऱ्या अनेक कंपन्यांच्या ठेकेदारांनी व उप ठेकेदारांनी त्या त्या जिल्ह्यातील स्थानिक नेते आम्हाला काम करू देत नाहीत,टक्केवारी मागतात,पैशाची मागणी करतात अशी तक्रार गडकरी यांच्याकडे केल्याची आणि गडकरी यांनी त्या नेत्यांची जाहीर खरडपट्टी केल्याची अनेक उदाहरणे आहेत.मात्र कांही ठिकाणी या महामार्गाचे काम करणाऱ्या ठेकेदार व उप ठेकेदार आणि स्थानिक नेते यांचे संगनमत होऊन निकृष्ट दर्जाची आणि थातुरमातुर कामे झाले आहेत हे तीन जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्ग खात्याच्या रस्त्यांच्या गुणवत्तेवरून दिसून येते

मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 66 रायगड रत्नागिरी व सिंधुदुर्ग या जिल्ह्यातून गेला आहेते पहिले तर प्रत्येक जिल्ह्यातील महामार्गाचे काम निकृष्टच झाले आहे.

# उच्च शिक्षण संचालकांविरुद्ध १० रुपयांचा जामीनपात्र वॉरंट

● नागपूर, (प्रतिनिधी):

उच्च न्यायालयाच्या आदेशानंतरही प्राध्यापकाला पेन्शन व भविष्य निर्वाह निधी देण्यात न आल्याने मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने उच्च शिक्षक विभागाच्या संचालकाविरोधात १० रुपयांचा जामीनपात्र वॉरंट काढला होता. मात्र शिक्षण संचालकांनी माफी मागून पुढील सुनावणीत प्रत्यक्ष हजर राहण्याचे आश्वासन दिल्यावर उच्च न्यायालयाने वॉरंटला तात्पुरती स्थगिती दिली.

मागील महिन्यात उच्च न्यायालयाने उच्च शिक्षण संचालक डॉ. धनराज माने यांच्याविरोधात १० रुपयाचा जामीनपात्र



वॉरंट काढला होता. याशिवाय उच्च शिक्षण विभागाचे तत्कालीन संचालक डॉ. शैलेंद्र देवळणकर, तत्कालीन सहसंचालक संजय ठाकरे आणि आताचे सहसंचालक संतोष चव्हाण यांच्याविरोधात अवमानना खटला चालवण्याचे आदेश दिले होते. न्या. नितीन सांबरे आणि न्या. अभय मंत्री यांच्या खंडपीठाने हा आदेश दिल्यावर शिक्षण अधिकाऱ्यांमध्ये खळबळ उडाली होती. पुणे पोलिसांना याबाबत कारवाई करण्याच्या सूचनाही न्यायालयाने केल्या होत्या. त्यामुळे शिक्षण संचालकांवर अटकेची टांगती तलवार होती. मात्र आता उच्च न्यायालयाने त्यांना पुढील सुनावणीपर्यंत दिलासा दिला आहे. हिंगणघाट येथील एका कॉलेजमध्ये कार्यरत प्रा. सुरेश पांगुळ यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. याचिकाकर्ता कार्यरत असलेले कॉलेज बंद झाल्यामुळे तेथील तीन शिक्षकांना त्याच संस्थेच्या दुसऱ्या कॉलेजमध्ये स्थानांतरित करण्याचा निर्णय घेतला गेला. मात्र, नंतर याला मान्यता दिली गेली नाही.

# भोजशाला कमाल मौला मशिद: पुरातत्त्व खात्याला आढळल्या ९४ भग्न मुर्त्या

## हिंदू मंदिर असल्याचा दावा

● मध्यप्रदेश, (प्रतिनिधी):

भारतीय पुरातत्व विभागाने सोमवारी भोजशाला कमाल मौला मशिदीबाबतचं सर्व्हेक्षण अहवाल मध्यप्रदेश उच्च न्यायालयाच्या इंदूर पीठापुढे सादर केला. पुरातत्व खात्याचे वकील हिमांशू जोशी यांनी दोन हजार पानांचा हा अहवाल उच्च न्यायालयात सादर केला आहे. जोशी यांनी सांगितलं की या प्रकरणी आता पुढील




सुनावणी २२ जुलै रोजी होणार आहे.

४ जुलै रोजी उच्च न्यायालयाने पुरातत्व खात्याला हे आदेश दिले होते की भोजशाला मशिद प्रकरणात वाद आहेत. या परिसरात जो सर्वे तुम्ही केला आहेत त्याबाबत अहवाल सादर करा. संपूर्ण अहवाल १५ जुलैपर्यंत सादर करावा. ही जागा हिंदू धर्मस्थळ आहे की मुस्लीम धर्मस्थळ यावरुन वाद आहे. त्या प्रकरणी कोर्टाने हे आदेश दिले होते. आता अहवालात काही गोष्टी समोर आल्या आहेत.

हिंदू समुदाय भोजशालाला हिंदू धर्मातील वाग्देवी म्हणजेच देवी सरस्वतीचं मंदिर मानतो. तर या ठिकाणी ११ व्या शतकापासून मशिद आहे असं मुस्लिम पक्षकारांचं म्हणणं आहे. भोजशालाचा संपूर्ण परिसर भारतीय पुरातत्व खात्याच्या अखत्यारीत आहे. हिंदू फ्रंट फॉर जस्टिस नावाच्या संघटनेने जो अर्ज केला त्यानंतर मध्यप्रदेश उच्च न्यायालयाने या प्रकरणात सर्वेक्षणाचे आदेश दिले होते.

# 'केदारनाथ मंदिरातील २२८ किलो सोनं चोरी झालं, माध्यमे शांत का?

**शंकराचार्य अविमुक्तेश्वरानंद यांचा संतप्त सवाल**



● नवी दिल्ली, (प्रतिनिधी):

दिल्लीच्या बुराडी परिसरात बाबा केदारनाथ यांचे प्रतिकात्मक मंदिर बांधले जाणार आहे. यावरून आता उत्तरेत राजकारण तापले आहे. या नव्या मंदिरामुळे केदारनाथ धाम येथे नाराजी पसरली असून त्यांनी या नव्या मंदिराचा विरोध दर्शविला आहे. त्यातच बद्रीनाथ ज्योतिर्मठ पीठाचे शंकराचार्य स्वामी अविमुक्तेश्वरानंद यांनी आज केदारनाथ मंदिरातून चोरी झालेल्या सोन्याचा मुद्दा उपस्थित करत टीका केली. मुंबईत त्यांनी शिवसेना उबाठा नेते उद्धव ठाकरे यांची भेट घेतल्यानंतर माध्यमांशी बोलत असताना विविध राजकीय विषयांसह धार्मिक विषयावरही सडेतोड भाष्य केले.

उत्तराखंडमधील केदारनाथ मंदिराच्या गाभाऱ्यातील सोने चोरी करून त्याठिकाणी पितळ ठेवले असल्याचा आरोप मागच्या वर्षी पहिल्यांदा करण्यात आला होता. मंदिरातील पुजाऱ्यांनीच हा आरोप केला होता. मात्र या आरोपाची छाननी करण्यास मंदिर समितीने ठाम विरोध दर्शविला. मंदिराचे पुजारी आणि चारधाम महापंचायतीचे उपाध्यक्ष संतोष त्रिवेदी यांनी मागच्यावर्षी सोशल मीडियावर व्हिडीओ पोस्ट करून सोने चोरी झाल्याचा आरोप केला होता.

शंकराचार्य स्वामी अविमुक्तेश्वरानंद मातोश्रीबाहेर माध्यमांशी बोलताना म्हणाले, केदारनाथ मंदिरात २२८ किलो सोन्याचा घोटाळा झाला आहे. यावर माध्यमे आवाज का उचलत नाहीत. आता दिल्लीत नवे केदारनाथ मंदिर बांधायची तयारी सुरू आहे. म्हणजे तिथेही नवा घोटाळा करणार का? केदारनाथ मंदिरातील सोन्याची चोरी झाल्यानंतर त्याचा तपास करण्यासाठी समिती का नाही स्थापन केली? असाही प्रश्न त्यांनी उपस्थित केला. पुजाऱ्याच्या व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर बद्री केदारनाथ धाम मंदिर समितीने पत्रक काढून सदर आरोप फेटाळून लावले आहेत.

# गोरखपूर एक्स्प्रेसमधून धुराचे लोट, मध्य रेल्वे विस्कळीत


● मुंबई, (प्रतिनिधी):

मध्य रेल्वेवर मार्गावर डोंबिवली ते ठाकुर्ली दरम्यान गोरखपूर एक्स्प्रेसमधून धुराचे लोट, किरकोळ आग आणि ठिणग्या उडत असल्याने, प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. गाडीच्या 'ब्रेक बाइंडिंग'ची समस्या झाल्याने एक्स्प्रेसची चाके रेल्वे रूळावरून व्यवस्थित धावू शकत नव्हती. या बिघाडामुळे मध्य रेल्वेचे वेळापत्रक पूर्णपणे कोलमडून गेले. आठवड्याच्या पहिल्याच दिवशी सोमवारी सकाळी ६.३२ च्या सुमारास डोंबिवली ते ठाकुर्ली दरम्यान डाऊन फास्ट मार्गावर गोरखपूर एक्स्प्रेसच्या एस-८ डब्यांमध्ये धुराचे लोट आल्याने प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण होते. त्यानंतर डब्याखालून आगीच्या ठिणग्या उडू लागल्या. घटनेची माहिती



मिळताच रेल्वे अधिकारी आणि कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. त्यानंतर तत्काळ दुरुस्तीची कामे करून सकाळी ६.५१ ला धुराचे लोट आटोक्यात आणले आणि एक्स्प्रेस पुढे मार्गस्थ झाली. गोरखपूर एक्स्प्रेसच्या बिघाडामुळे तपोवन, इंद्रायणी एक्स्प्रेससह अन्य रेल्वेगाड्यांचे वेळापत्रक कोलमडले.

# कॅम्लिन उद्योग समूहाचे सर्वेसर्वा सुभाष दांडेकर यांचे निधन



● मुंबई , (प्रतिनिधी):

कॅम्लिन उद्योगसमूहाचे प्रमुख व हजारो कुटुंबाना रोजगार मिळवून देणारे मराठमोळे उद्योजक सुभाष दांडेकर यांचे आज (१५ जुलै) सकाळी सातच्या दरम्यान निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर दुपारी ३.३० वाजता दादरमधील शिवाजी पार्क स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. सुभाष दांडेकर हे चित्रकलेसाठीच्या साहित्य निर्मितीतील अग्रेसर अशा कॅम्लिन उद्योगसमूहाचे सर्वेसर्वा व आधारस्तंभ होते. शालेय विद्यार्थ्यांना लागणारी गणितीय उपकरणे, पेन्सिल, मार्कर, शाई यांसह चित्रकार व अन्य कलाकारांना लागणारे सर्व प्रकारचे साहित्य, कार्यालयीन उत्पादने आणि व्यावसायिक उत्पादनांची निर्मिती कॅम्लिन या कंपनीकडून गेल्या अनेक वर्षांपासून होत आहे. या कंपनीची गेली अनेक वर्षे धुरा वाहताना दांडेकर यांनी उत्पादनांची गुणवत्ता व मूल्यांशी कधीच तडजोड केली नाही.

# योग्य उपाय आणि सावधगिरी बाळगल्यास सर्पदंश व त्यामुळे होणारे मृत्यू रोखता येऊ शकतात-जिल्हाधिकारी किशन जावळे



● रायगड, (प्रतिनिधी):

पावसाळा सुरू झाल्यामुळे तसेच शेतात काम करताना अनेकदा सर्पदंश होण्याच्या घटना आपल्या जिल्ह्यात आढळून येतात. योग्य उपाय आणि सावधगिरी बाळगल्यास सर्पदंश व त्यामुळे होणारे मृत्यू रोखता येऊ शकतात. याबाबत समाजात जनजागृती करण्याचे काम आरोग्य विभागाने करावे,असे आवाहन जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी केले.

यंदाच्या पावसाळयात आरोग्य विभागामार्फत जिल्हा शासकीय रुग्णालय तसेच प्राथमिक आरोग्य केंद्रस्तरावर सर्पदंश प्रतिबंधक लस पुरेशा प्रमाणात उपलब्ध ठेवण्यात आली आहे. सरासरी 15 ते 25 लसीचा प्रत्येक आरोग्य केंद्रात साठा करण्यात आला आहे. 15 तालुक्यांमध्ये प्राथमिक आरोग्य केंद्रस्तरावरील लस उपलब्ध असून जिल्हास्तरावर अतिरिक्त लस सज्ज ठेवण्यात आली आहे.

सर्पदंश झालेल्या रुग्णांसाठी एएमबीएचयु बॅग, लॅरिंगोस्कोप ही साधने, एड्रेनालाईन, हाइड्रोकोर्ट, एट्रोपिन, नियोस्टिग्माइन ही इंजेक्शन जिल्हा रुग्णालयात उपलब्ध ठेवली आहेत. त्याचप्रमाणे प्रत्येक आरोग्य केंद्रात ऑक्सिजन सिलिंडर भरून ठेवण्याची सूचना देण्यात आली आहे. नागरिकांनी

सर्पदंश झालेल्या व्यक्तीला धीर देऊन सर्वात अगोदर जवळच्या कोणत्याही सरकारी रुग्णालयापर्यंत आणावे. सर्पदंशाच्या बहुतांश घटना ग्रामीण भागात शेतामध्ये काम करत असताना घडतात.

शेतकऱ्यांनी सर्वतोपरी काळजी घेऊनच शेतात जावे. पायात गम बूट असावेत, तसेच अंगावर पूर्ण कपडे असल्यास दंशाची तीव्रता कमी असते. सर्पदंश हा अपघात असून घाबरून जाऊ नका.सावध रहा काळजी घ्या असे आवाहन जिल्हाधिकारी श्री जावळे यांनी केले आहे.

**सर्पदंश झाल्यास काय करू नये**

विष तोंडाने ओढून काढू नका. सर्पदंशाच्या जागी चिरा घेऊ नका. सर्पदंशाची वरील/खालील बाजू कशानेही बांधू नका. वैदू, बुवा, बाबा यांच्याकडे जाऊ नका. साप शोधण्यात, मारण्यात वेळ वाया घालवू नका. सर्पमित्राची मदत घ्या.